# ॥ चैतन्य लहरी ॥

ऑक्टोबर-नोव्हेंबर सन १९९७ क्र. १०, ११



तुम्ही अशी नम्रता मिळवली पाहिजे, स्वत:ही इतके नम्र बनले पाहिजे की तुम्ही जे कांही कराल ते सर्व जगाच्या कल्याणासाठी आहे हे तुम्हालाच समजेल आणि हे घटित होणारच आहे कारण त्यासाठीच तुम्ही या परमचैतन्याचे वाहक बनले आहात..

– श्री माताजी निर्मलादेवी
शिवरात्री पूजा

# शिवरात्री पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण

(दिल्ली १६-३-९७)

शिव हे सदाशिवांचे प्रतिबिंब आहेत. शिव आत्मस्वरूपांत आपल्या हृदयात सदैव प्रस्थापित आहेत; तिथे त्यांचा वास आहे. त्या स्थानी ते प्रकाशित आहेत असे मी म्हणणार नाही. कुण्डलिनीचे जेव्हा जागरण होते तेव्हा श्री शिव जागृत होतात आणि ते चैतन्य आपल्या नसांमधून वाहू लागते. चैतन्यालाच "मेधास्थिति" असे नाव आहे.

सर्वप्रथम आपले हृदय व मेंदू जोडले जातात. सामान्यतः माणसाचा मेंदू आणि त्याचे मन विरुद्ध दिशेने कार्य करत असतात. हा योग घटित झाल्यावर आपल्या आत्म्याचा प्रकाश चैतन्यस्वरूपात आपल्या मस्तकामध्ये व टाळूमध्ये पसरु लागतो. त्यानंतर समजून घ्यायला हवे की हा प्रकाश आपल्याला मिळाल्यावर आपल्या जीवनात परिवर्तन घडून आल्याचे आपण पाहतो. आपला राग आणि वाईट सवयी कमी व्हायला लागतात, हळुहळु हे दोष पूर्णपणे गळून जातात आणि आपल्यामध्ये श्रद्धा प्रस्थापित होते. त्यातूनच अनासक्तपणाची भावना जागृत होते; इतर गोष्टींचे महत्त्व वाटेनासे होते.

शिवतत्त्व हे फार उन्नत झालेले रुप आहे. त्यांना कशाचीही पर्वा नसते. त्यांच्या केसांच्या जटा झालेल्या असतात. कपड्यांची त्यांना फिकीर नसते तसेच काय करावे हे भान नसते. हे सर्व काम त्यांनी विष्णूवर सोपवले आहे. आणि स्वतः त्यापासून पूर्णपणे अलिप्त झाले आहेत. त्यांचे वाहन नंदी आहे ज्यांना कुणीही माणसाळावत नाही. तो जिथे नेईल तिकडे शिव जातात. आपल्या स्वतःमध्ये ते इतके पूर्णपणे स्थिरावले असल्याने लोक काय म्हणतील याची ते पर्वा करत नाहीत. ते जेव्हा विवाह करण्यासाठी आले तेव्हा विष्णूंना वाटले "हा पुरुष माझ्या बहिणीचा पति कसा काय?" पण पार्वतीला माहीत होते की तेच तिचा पति होण्यास लायक आहेत.

ते सदा-सर्वकाळ खूप प्रवृत्तीचे आहेत. त्यांना कसलीही पर्वा नाही. एकदा कोणी सर्व गोष्टींच्या पार गेला की त्याला सर्व गोष्टी सारख्याच वाटतात, त्यांच्याकडे त्यांचे चित्तच जात नाही. या स्वरूपामध्ये आपण शिवांना जेव्हा जाणतो तेव्हा ते लोभस वाटते.

सहजयोग्यांमधे शिवतत्त्व जागृत झाल्यावर त्यांचे जीवनही बदलते. सहजयोगात येणारे लोक, पुरुष व महिला, दोघेजण आधी कपड्यालत्त्यांच्या बाबतीत हौशी असतात. त्यांचे लक्ष सदैव पेहरावाकडे. आज ब्यूटि-पार्लरकडे खूप स्त्रिया जातात. त्याशिवाय चालत नाही. पण आत्मप्रकाश मिळाल्यावर जेव्हा तुम्ही आतून सुंदर बनता तेव्हा या सर्व वरवरच्या गोष्टी फालतू वाटायला लागतात आणि आत्म्याच्या सुखाकडेच तुमचे लक्ष लागते. शारीरिक सुख - आरामबद्दल तुम्ही उदासीन होता. आता हे परदेशातील सहजयोगी पहा.तिकडे त्यांची घरे फार मोठी असतात, गाडी वगैरे त्यांच्याजवळ असते. पण ते आपल्याकडे आले की असेल त्यात समाधानी असतात. भारतीयांचे असे नाही; कुठेही प्रवासाला गेले की अटॅच्ड-बाथरुमपासून त्यांना सर्वकाही पाहिजे असते. अजूनही ते या गोष्टींपासून वर आलेले नाहीत. मला आश्चर्य वाटते की भारतासारख्या गरीब देशातील लोकांनाही भौतिक हाव अजून आहे. ते लोक म्हणतात "माताजी, आश्रमासाठी मोठी जागा घेऊ या." आपले भारतीय लोक आश्रमात रहायलाच तयार नसतात. आपण हा आश्रम खूप कष्ट करून व पैसे खर्च करून बांधला पण इथे कुणाला रहायला

नको. आम्ही म्हटले की तुम्हाला खर्चाला सर्व पैसा पगार म्हणून देऊ तरी कुणी तयार नाही. आमच्या जन्मगावी. छिंदवाड्याला आम्ही खूप खर्च केला आणि वयस्कर निवृत्त सहजयोग्यांना रहायला सांगितले, तिथली हवा छान आहे. डोंगरावरचे स्थान आहे पण कुणीही जायला तयार नाही. सगळ्यांना आपल्या आरामाची काळजी-माझं घर, माझी जागा. माझं कुटुंब, माझं खाणं-पिणं--- एवढच! खाण्यापिण्याच्या बाबतीतही फार चोखंदळ. आपल्या सवयीमुळे भारतीय लोक फार कन्डिशन्ड असतात. परकीयांचे तसे नसते. ध्यानामधून आपण या सर्वांपासून मुक्त झाल्याशिवाय आपली वाढ होत नाही.

त्याग करण्याच्या बाबतीत आपण मागे पडतो. एन्. जी. ओ. प्रकल्पासाठी जमीन खरेदी करण्यासाठी सहजयोग्यांना पूजा-वर्गणी वाढवायला सांगितले. लगेच त्यावर खूप प्रतिक्रिया, आरडाओरड झाली. तुमच्याकडून काहीही पैसे न मागता मी कार्य करत आले. पण एखाद्या चांगल्या कार्यासाठी तुमच्याकडून पैसे मागितले तर काय बिघडले? सर्व त्याग करणारे अनेक लोक मी आयुष्यभर पहात आले पण आजकाल ती भावनाच नाहीशी झाली आहे. तसं कुठे पहायलाच मिळत नाही. माझी आई, सहा साड्यांच्यावर एकही ठेवत नसे. एक जरी जास्त आली तर देऊन टाकणार. कबेलामधे जे लोक येतात त्यांना स्वतंत्र खोली हवी असते, सगळ्यांच्या बरोबर रहायची इच्छाच नाही याचे मला आश्चर्य वाटले. जो सामूहिकतेत राहू शकत नाही तो सहजयोगी नाहीच. पण "मी मोठी विशेष व्यक्ति. माझी खास व्यवस्था हवी." असा माणूस नुसता नावाचा सहजयोगी. शिवाची पूजा करणाऱ्यांनी शिवासारखे झाले पाहिजे. त्याला कुठेही झोपायला जागा द्या, काहीही जेवायला द्या, जो काळाच्या पलीकडे गेला त्याला कसलीही बांधिलकी नाही. असा माणूसच खरा सहजयोगी. तुमच्यामध्ये शिवांचा प्रादुर्भाव आला आहे. पण ही स्थिती मिळवण्यासाठी लोकांनी किती तपस्या केली देव जाणे. इतरत्र कुठेही जा, तुमच्याजवळचे सारे पैसे लुबाडतील काय काय तऱ्हा करतील, पण सहजयोगात तसं नाही. पण ही आपली प्रवृत्ति जायला हवी. आपण काय काय त्याग करू शकतो हेच पहात चला. ही 'मस्ति' जोपर्यंत तुम्हाला जाणवत नाही तोपर्यंत तुम्ही शिवांचे पुजारी गणले जाणार नाही.

माताजींच्या जवळ सर्व तऱ्हेचे भक्त आहेत, त्यात काही विशेष नाही. तुम्ही काहीही केले तरी माताजी आई म्हणून क्षमाच करणार. पण क्षमा केली गेल्यावरही ती स्थिति तुम्हाला येत नाही. क्षमबद्दलची सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येकाने शिवांकडे क्षमायाचना करायला हवी कारण जे करायला नको तीच चूक आपण पुन्हा पुन्हा करत असतो. म्हणून आपण शिवांची (शिव-शंभू) क्षमा मागितली पाहिजे. आपण चुका करत राहतो, आपल्या गरजा भागवण्याचा प्रयत्न करतो - आपल्या गरजा जोपर्यंत संपत नाहीत तोपर्यंत आपण शिवांकडे क्षमायचना करावी. हे हवे, ते हवे अशा गरजा- माझं घर, माझी पत्नी- जोपर्यंत संपत नाहीत तोपर्यंत आपण शिव-भक्त होत नाही. या बाबतीत परदेशीय लोक ज्यांनी शिवांचे नावही कधी ऐकले नव्हते, फार पुढे गेले आहेत. आपण अजून लहान-सहान गोष्टींनाच महत्त्व देत आहोत आणि त्यातच अडकून बसलो आहोत. शिवभक्त व्हायचे तर आपल्यामधील मत्सर आणि निगेटिव्हिटी आपण दूर केल्या पाहिजेत. पण सहजयोगात येऊनसुद्धा लोक स्वतःकडे पाहू शकत नाहीत. एक महिला आपल्या सुनेला अजूनही छळत असल्याचे मला समजले. मी तिला विचारले तर म्हणाली "मी कधीच कुणाला वाईट वागणूक दिली नाही." महणजे बघा. त्या सिनेमा बघतील आणि सुनेला सासुकडून छळ झाल्याचे पाहून रडायला लागतील पण घरी यऊन पुन्हा सारा तोच प्रकार सुरू! तीच गोष्ट सुनेची; ती पण म्हणणार "मी कधीच कुणाला त्रास दिला नाही." स्वतःशी आतमधून प्रामाणिक राहिल्याशिवाय सहजयोगात तुम्हाला गहनता येणार नाही.

सहजयोग तुमच्यामधे परिवर्तन घडवतो. तुम्ही आता सोन्यासारखे शुद्ध झाला आहात, सोन्याला कधी डाग पडत नाही. आता तुम्ही त्या स्थितीला आला आहात. मग तुम्ही गुलाम जगातील क्षुल्लक गोष्टींचे अजूनही कसे राहू शकता? हीच कुण्डलिनीची विशेषतः आहे, ती तुम्हाला पूर्णपणे स्वच्छ करते. आता सेवा-कार्य, आता तुम्ही सेवा केली पाहिजे. मला तुमच्या सेवेची तर मुळीच जरुर नाही. मी स्वतःशी समाधानी आहे. मग माझ्याकरता तुम्ही काय करणार? एवढंच करा की तुम्ही पण ते समाधान मिळवा आणि त्याचा आनंद उपभोगा त्या आनन्दाच्या स्थितीमधे

तुम्हाला कळेल की या सर्व गोष्टी तुम्हाला आनंद देण्यासाठीच आहेत. सहजयोगात आल्यावर ती स्थिति प्राप्त केल्यानंतर इतर गोष्टींची तुम्हाला गरज कशाला वाटेल?

खूप विचार केल्यावर माझे मत आता असे झाले आहे. सहजयोग अगदी सोपा आहे आणि म्हणूनच फार अवघड आहे. नाही तर ५ुणी तरी काठी उगारून तुमच्या मागे लागून "आता डोक्यावरचे केस काढा, भगवी वस्त्रे नेसा, चौदा दिवस खाणेपिणे नाही" असे म्हणू लागला तर ठीक होणार ! पण हृदयापासून, मनापासून व बुद्धि वापरून सहजयोग पत्करल्यावर आपले दोष व चुका सुधारून स्वत:ला सुधारले पाहिजे. मी असं का केले. असं करायलाच हवे होते का असा सतत विचार करत करत पुष्कळ वाईट गोष्टी तुम्ही टाकून द्याल आणि आपण 'समर्थ' असल्याचे तुम्हालाच कळेल. तुम्हाला कशाची गरज नाही; कशाची इच्छा नाही आणि आरामात बसला आहात आणि तुम्हाला काहीच नको असल्याचे कळल्यावर हे परमचैतन्य तुमच्यासमोर भरभरुन ताट ठेवेल. कदाचित तुम्हाला मोहात पाडण्यासाठीसुद्धा तसे होईल. तुम्हाला गरज वाटेल आणि ती त्याच्याकडून पुरी होणार नाही असे होणारच नाही.

आज आपण शिवांना खूप आवाहन केले आणि त्यांना असेच लोक आवडतात. माझ्या आणि त्यांच्यामधे फरक असा आहे की मला सगळ्या प्रकारचे लोक आवडतात तर शिवांना ज्यांनी आपले दोष, सवयी, संस्कार सर्वांचा त्याग केला आहे असेच लोक आवडतात. आपल्या कण्डिशन्स अनेक आहेत. उदा. आपल्याला अमक्याच तऱ्हेचे कपडे हवे. ते नाही तर काय झाले? पण सहजयोगामधे 'संन्यास' बाह्यातून नसतो तर आपल्या आतमधून असतो. आतुन 'संन्यस्त' झाल्यावर तुमच्या इच्छाच संपतात. कुठेही असलात तरी आनंदी असता. पूर्वी 'नाथ-पंथी' होते आणि ते दूर-दूरवर हिंडून लोकांना उपदेश देत असत. ते कुठे-कुठे गेले याचे मला आश्चर्य वाटायचे. मी कोलंबियाला गेले होते तिथे मला समजले की नाथपंथी बोलिव्हियालाही गेले होते. कोलंबियाचा विमान-प्रवास करताना तिथे विमान इतक्या उंचीवरून जाते की चक्कर यायला लागते आणि त्याकाळी हे लोक पायी तिथे गेले ! ते तिथे कसे पोचले असतील मला कळत नाही. ते रशिया आणि इतर देशांमधेही गेले होते; त्यांनी एवढा प्रवास कसा केला असेल, त्यांनी कपडे काय केले असतील कुणाला ठाऊक! कारण ही स्थिति मिळाल्यावर तुम्ही सिद्ध - पुरुष बनता जसे शिरडीचे साईनाथ; ते कुठेही प्रकट व्हायचे, प्रत्येकाला अडचणीत मदत करायचे. काही लोक सांगतात "माताजी, आम्ही त्यांना पाहिले" आणि मी म्हणायचे "असे होऊ शकते." असे संत-लोक अमर असतात. आणि ती अमर-अवस्था मिळवणे हीच शिवांची खरी पूजा.

पुढील भाषण इंग्रजीतून झाले.

आज मी तुम्हाला सहजयोगानंतर आपली आतली स्थिती काय बनते त्याबद्दल सांगणार आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळतो तेव्हा एकादश-रुद्र आलेले असतात. ते शिवांच्या शक्तीचे अंश असतात आणि ते सर्व आपल्यामधे जीवनाबद्दलच्या ठाण मांडून बसलेल्या चुकीच्या कल्पना काढून टाकण्याचे प्रयत्न करतात. बुद्ध व महावीर हे यापैकीच आहेत. कुण्डलिनीच्या उत्थानानंतर ते रुद्र जागृत होतात. ते सर्व जण आपल्याला नको त्या गोष्टींच्या प्रभावातून बाहेर खेचत राहतात. उदा. आपल्यामधे अहंकार असतो त्याच्याकडे बुद्ध लक्ष ठेवतात. ते असं काम करतात का आपणच आपला अहंकार जाणून भयचकित होतो; हे समजल्यावर आपल्याला आश्चर्याचा धक्का बसतो आणि त्यामुळे अपमानित व क्षुद्र वाटून घेतो. पण जेव्हा हा रुद्र जागृत नसतो, जेव्हा त्याच्यामध्ये प्रकाश आलेला नसतो तेव्हा काय होते? तर तुम्ही स्वत:चेच समर्थन करू लागता- आपण जे काय करतो, केले आहे, बोलून दाखवले आहे किंवा मिळवले आहे ते सर्व बरोबरच आहे असं समजू लागतो, आपले काहीच चुकले नाही असे समजतो. म्हणून या बुद्ध रुद्राचे जागरण व्हावे लागते.

याच्या उलट तुम्ही अहंकारालाच गोंजारत राहिलात, अहंकारीपणा गाजवू लागलात की तुम्ही पूर्णपणे उजव्या बाजूची व्यक्ति बनता आणि एकदा तसे झाले की तुमचे व्यक्तिमत्व कसे होते हे तुम्ही जाणताच अशा वेळी तुम्ही शांतपणे स्वत:ला बघून आत्मपरीक्षण केले आणि अहंकाराने आपले काय नुकसान केले आहे, स्वत:बद्दलच्या काय काय चुकीच्या कल्पना आपल्या डोक्यात भरवल्या आहेत हे जाणून घ्या. त्यासाठीच मोहम्मदसाहेबांनी सांगितले की स्वत:वरच जोडेपट्टी करा. आणखी दुसरं ते काय सांगणार? कारण हा अहंकार तुमच्या डोक्यामधे स्फोट घडवून काय -

काय समस्या समोर आणील याचा भरवसा नसतो आणि शेवटी त्या माणसाला असा विचित्र रोग(Yuppies) होतो ज्या मुळे तुमचे मन आणीव अजिबात काम करेनासे होऊन निकामी बनते. जाणतेपणाने माणूस हालचाल करू शकत नाही, अजाणता हालचाल होईल पण जाणीवपूर्वक नाही होणार. हा रोग इतका भयानक आहे की माणूस सरपटणाऱ्या प्राण्यासारखा होतो. त्यांना अंगावर घेऊन जावे लागते कारण त्यांना चालणे शक्य नसते, स्वतःहून ते चालू शकत नाही किंवा खाली बसू शकत नाही, हा रोग तरुण वयातही होऊ शकतो.

म्हणून स्वतःच्या अहंकाराकडे लक्ष ठेवा, त्यावर नियंत्रण ठेवा आणि त्या दोषाबद्दल क्षमाशील व्हा. सहजयोगामधे आपल्याला पश्चात्ताप वाटत नाही हा प्रकार नाही कारण आपला विश्वास असतो की आपल्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे आणि आपण चुकीच्या गोष्टींपासून दूर आहोत. पण हे खरं नाही. आपल्याला पश्चात्ताप झाला पाहिजे. आता इंग्रजी भाषेमधे "सॉरी" हा प्रकार आहे, प्रत्येक गोष्टीबद्दल 'सॉरी' टेलिफोन उचलल्यावरसुद्धा ते म्हणणार "सॉरी". मी म्हणते सॉरी कशाबद्दल? हा नुसता पोकळ शब्द आहे. त्याला अर्थ नाही आणि त्यात खोली (प्रामाणिकपणाची) पण नाही. तुम्ही सॉरी म्हणता तेव्हा काय चूक झाली म्हणून ते म्हणता आणि ती कशी सुधारणार इकडे बघा. आजकालच्या आधुनिक पिढीमध्ये हा मोठा प्रश्नच आहे कारण आपल्याकडील आर्थिक भरभराटीमुळे, औद्योगिक प्रगतीमुळे, मोठमोठ्या संस्थांमुळे आपला अहंकार वाढायला उत्तेजनच मिळत आहे. तसं नाही केले तर आपला तरणोपाय नाही. आपल्याला कुठेच किंमत राहणार नाही.म्हणूनच आपण अहंकाराचा बडेजाव मानतो आणि हे उजव्या बाजूचे प्रश्न चालू होतात. प्रतिक्रिया म्हणून मस्तकाच्या डाव्या बाजूवर त्याचा दबाव येतो. उजव्या बाजूला अहंकार बळावतो. डावीकडचे रुद्र महावीर आहेत. म्हणून लोक चुकीच्या, अनैतिक गोष्टी करू लागतात जे श्री गणेशांच्या विरोधात असते.

महावीरांजवळ नियंत्रण करणाऱ्या शक्ति असतात. ते तुम्हाला नरकात जायला सांगतील. आणखी काहीतरी होईल, अनेक नरकयातनांचे वर्णन करतील, तुम्ही नरकात जाणार व जिवंत गाडले जाणार, असे तुम्हाला घाबरवण्यासाठी काय काय वर्णने करतील मलाच सांगता येणार नाही. पण त्याचाही काही उपयोग होत नाही आणि लोक जास्तच डावीकडे झुकायला लागतात आणि या रुद्रांजवळ जातात. हे रुद्रही जेव्हा काही करु शकत नाहीत तेव्हा मात्र प्रचंड नैराश्य येते. अरे देवा, काय हे नैराश्य, मला काहीतरी झालंय्र असं म्हणूं लागतात. त्यातूनच तुम्ही दुसऱ्यांना घाबरावून टाकता आणि त्यांच्या भावनिकतेला बदनाम करता; वेडेवाकडे चाळे करुं लागता आणि स्वतःचेच डोके बडवायला लागता. हे अहंकारातून किंवा डावीकडच्या समस्यांमुळे होते.

हे दोन्ही रुद्र आपल्या डाव्या व उजव्या सिंपथेटिक नर्व्हस्‌सिस्टिम बरोबर पूर्णपणे संबंधित असल्यामुळे फार महत्वाचे आहेत. म्हणून तुम्ही या रुद्रांच्या तावडीत पडणार नाही याबद्दल सतर्क राहिले पाहिजे; त्यांना प्रसन्न ठेवणे जरुरीचे आहे. म्हणून अहंकार आणि स्वतःचीच कीव करण्याची भावना यांच्यावर नियंत्रण करणाऱ्या या दोन्ही रुद्रांना तुम्ही सांभाळले पाहिजे म्हणजे तुम्हाला त्रास होणार नाही; तसेच 'मला हे जमणार नाही, ते नको' इ. तक्र रारी व नैराश्य दूर होतील. कारण त्याच्यांमुळे पुढे फार गंभीर प्रश्न, कॅन्सरसारखे आजार होण्याची शक्यता असते. रुद्र पकडले गेले तर दोन्ही बाजूंना सूज येते. त्याला 'मेधा' म्हणतात. कॅन्सरचा माणूस पाहिलात तर त्याला सगळीकडे सूज आल्याचे दिसते; कपाळाच्या डाव्या किंवा उजव्या बाजूकडे तरी सूज आढळते. रुद्रांचा हा त्रास डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे इतक्या नकळत झुकतो आणि त्या व्यक्तीच्या स्वभावात न समजण्यासारखे बदल फटकन्र दिसतात की कुठल्या रुद्राचा त्रास आहे हे सहजासहजी लक्षांत येत नाही. मनोविकाराचे सर्व आजार हे दोन रुद्र काम करेनासे झाल्यामुळे होतात. सतत नैराश्य किंवा आक्र मकपणा या दोन्ही प्रवृत्तीमुळे असे त्रास होतात. त्याची आणखी काही कारणेही असूं शकतात पण ते सर्व सदाशिवांच्या शक्तीचेच भाग असतात. त्यांचा स्वभाव करुणेने ओतप्रोत भरलेला आहे. करुणेचे ते सागरच आहेत. त्यांना नुसती क्षमा मागितली की लगेच क्षमा करतात. पण तुम्हाला जर असं वाटत असेल की तुम्ही जे काही करता ते योग्यच आहे. तुम्ही कधीच कुणाचा छळ केला नाहीत. कधीच कुणाला दुःख दिले नाही तर मात्र त्यांना सर्व काही

आधीच समजलेले असते. आणि ते जाणतात म्हणून ते त्याचा त्याग करु पाहतात.

त्या स्थितीत येण्याची तुमची प्रबळ इच्छा व शिवाचे आशीर्वाद एकमेकांना पूरक असतात. शिवाचे आशीर्वाद मिळाले की तुमची इच्छा अधिकाधिक प्रखर होत जाते. पण आपले व्यक्तिमत्व एका अत्युच्च स्तरावर नेणे आपल्या हिताचे आहे हे जाणण्यासाठी तुमची इच्छाशक्ति पूर्णावस्थेला यायला हवी. ते स्वतः फालतू सामान्य माणसासारखे नाहीत. समजा शिवांना तुम्ही एखाद्या पार्टीला जाऊ असे म्हटले तर ते कसे दिसतील? तिथले लोक त्यांच्याकडे पाहून हसणारच.

मला कांही हिप्पी लोक भेटले तेव्हा मी त्यांना विचारले "तुम्ही तुमचे केस असे कां ठेवता?" तर ते म्हणाले "आम्हांला आदिवासी बनायचे आहे." मग मी म्हणाले " तुमचा मेंदू आता प्रगत झाला आहे तर मग आदिवासींसारखे केस ठेऊन काय उपयोग होणार आहे?" म्हणजे स्वतःची अशी फसवणूक करण्यात काही अर्थ नाही. सर्वांत चांगले म्हणजे आत्मपरीक्षण करुन स्वतःचे काय चुकत आहे हे जाणावे. असे जर घडून आले, इथे बसलेल्या सर्व सहजयोग्यांनी तसे करुन स्वतःला सुधारले तर राजकीय, आर्थिक आणि इतर सर्व प्रश्न सुटतील अशी माझी खात्री आहे. पण आजकाल या कलियुगामुळे असा प्रकार झाला आहे की अगदी खराब लोकांचीही चलती आहे.

जगाला वाचवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. जबाबदारी अशी की आपल्याला एक महान आदरणीय व्यक्ति बनायचे ज्यामधे वरवरच्या गोष्टी, नसता दिखाऊपणा याला थारा नाही तर आतून अशी उन्नतावस्था मिळवायची की आपल्या आत्म्याचा प्रकाश आजूबाजूला पसरेल आणि या जगाला प्रकाशित करेल. हे समजून घेणे फार महत्वाचे आहे. आपले सर्व प्रश्न, मनोविकाराचे आजार, एवढेच नव्हे पण या कलियुगातील मानवाच्या सामूहिक जीवनामधील राजकीय व आर्थिक प्रश्न ही सारी परिस्थिती माणसांनीच बनवली आहे. ते काही देवाने निर्माण केले नाहीत; उलट परमेश्वरी शक्ति या सर्वांचे परिणाम सुसह्य करण्याच्या प्रयत्नांत असते. सहजयोग खऱ्या अर्थाने जगणारे पुष्कळ सहजयोगी जर तयार झाले,असे आपण साध्य करु शकलो तर मला वाटते खूप मोठे कार्य होईल. सर्व मानवजातीच्या कल्याणाचे होईल आणि त्याचसाठी आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. तुमच्या स्वतःकरतां, तुमच्या कुटुंबाकरतां,शहरापुरता किंवा देशापुरता नव्हे तर सर्व जगासाठी सहजयोग हे घडवून आणणार आहे.

तुमच्यामधें स्पर्धा असेल तर ती दुसऱ्या कशासाठी नसून आपल्या उन्नतीसाठी स्पर्धा हवी. पण लोक इतके उथळ आहेत की त्यांना वाटते की वरवरचा देखावा करुन किंवा आपण कोणी विशेष आहोत असे दाखून आपण कांही विशेष असे मिळवू शकूं. तुम्ही अशी नम्रता मिळवली पाहिजे,स्वतःही इतके नम्र बनले पाहिजे की तुम्ही जे कांही कराल ते सर्व जगाच्या कल्याणासाठी आहे हे तुम्हालाच समजेल. आणि हे घटित होणारच आहे कारण त्यासाठीच तुम्ही या परमचैतन्याचे वाहक बनले आहांत. मी जर एकटी हें करुं शकत असते तर मी केले असते पण तसें ते होणार नाही. म्हणूनच मी तुम्हाला एकत्र आणून सांगत असते की तुम्ही लोकच परमशक्तीचे वाहक बनायला हवे. पण तसं होतांनाही तुम्ही आनन्द मिळवीत आहांत,जीवनांतील प्रत्येक क्षण आनन्दाचा होत आहे आणि ही शिवांचीच कृपा आहे. जे कांही घडत आहे,क्षणाक्षणाला जे महान कौतुकास्पद व वाखाणण्यासारखे होत आहे ते सर्व शिवांकडूनच होत आहे. आणि स्वतःचा धिक्कार न करता किंवा अहंकाराचा बडेजाव न करतां स्वतःला नीटपणे ओळखण्याची स्थिति तुम्हाला मिळवायची आहे. हीच फक्त महत्वाची गोष्ट आहे. तुम्हाला आतां काय कमी आहे? तुम्हाला काय प्रश्न–अडचणी आहेत? अडचण हीच आहे की तुम्हीच तुमच्यामधे अडचणी निर्माण करत आहांत. तुम्ही जर हें जाणण्याची खरी क्षमता मिळवू शकाल तर तुम्ही साऱ्या जगाला तोच आदर्श दाखवू शकाल आणि जगामधें परिवर्तन घडवून आणाल अशी मला खात्री आहे. एरवी हे खोलवर रुजलेले प्रश्न वरवरच्या उपायांनी सुटणार नाहीत. कुण्डलिनी तुमच्यावर प्रसन्न झाली आहे आणि तुम्ही दीपस्तंभासारखा सत्याचा, प्रेमाचा आणि आनंदाचा प्रकाश सर्वांना देऊ शकाल.

परमेश्वराचे तुम्हांला अनंत आशीर्वाद.

○○○

# वाढदिवस - पूजा

## प.पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण

(नवी दिल्ली २१ मार्च ९७)

आपणा सगळ्यांना अनंत आशीर्वाद. डॉक्टरसाहेबांनी एक झोपेची गोळी दिली आणि मी झोपून गेले. पण इकडे तुम्ही सर्व जण भजन-गाणी गात होता; मला वाटले की ज्यांना गाण्याचा प्रसंग मिळाला नव्हता त्यांना पण गाणी म्हणण्याचा अवसर मिळेल. सर्व काही ठीक चालले आहे. पण जगांतील सारी माणसे जेव्हा झोपलेली असतात तेव्हा सहजयोगी जागा असतो; आणि जेव्हा सारी माणसे जागी असतात तेव्हा सहजयोगी झोपलेला असतो. याचा अर्थ एवढाच की सहजयोग्याचे चित्त जिथे लागलेले असते तिथे इतर माणसांचे लक्ष नसते; त्यांचे मन दुसऱ्याच गोशींमध्ये अडकलेले असते. कुठल्या ना कुठल्या कारणामुळे ती माणसे सत्यापासून दूर (विमुख) असतात. म्हणजे पहा की कुणाला पैशाची काळजी. कुणाला सत्तेची फिकीर; माणूस या साऱ्या भानगडीमधें माणूस कसा गुंतून भरकटत असतो समजत नाही; आणि या साऱ्यामुळे त्याची नजर सत्याकडे वळतच नाही. आता कुणी याचे विश्लेषण करत बसेल, याला कारण अमुक आहे, तमुक आहे असे सांगत बसेल. पण मी तर याच्या मुळाशी अज्ञान आहे असेच म्हणेन. अज्ञानामधे मनुष्य काय काय करत राहील सांगता येणार नाही. जणू तो एक प्रकारच्या अंधारामध्ये चाचपडत असतो. समजा इथे आत्ता एकदम दिवे जाऊन अंधार-अंधार झाला तर काय गडबड होईल; कुणी इकडे-तिकडे पळायला लागतील, धावपळीमधे काही लोक पडतील, त्यांच्या अंगावर इतरांचे पाय पडतील, कुणाला दुखापत होईल वगैरे काहीही होऊ शकेल. आपण लोकह अशाच अंधः कारात आहोत. अशा अवस्थेत आपण असतो तेव्हा झोपी गेल्यासारखे असतो. पण जेव्हा या झोपेतून 'जागृत' होतो. कुण्डलिनीचे जागरण होऊन जेव्हा तुम्ही सत्याला सामोरे होता त्या सत्याची महती कुणी वर्णन करून सांगू शकणार नाही. एकाला मी विचारले की, "सहयोगात येऊन तुला काय मिळाले?" तर म्हणतो, "माताजी, काही एक असं सांगता येणार नाही पण सारं काही मिळाले." मी पण आजच्या या दिवशी म्हणेन की सहजयोगांत मला सर्व काही मिळाले. मी जेव्हा लहान होते तेव्हा माझ्या वडिलांना म्हणायची की आकाशात जसे तारे चमकत आहेत तसे या जगामध्ये अनेक तेजःपुंज लोक बनावेत आणि परमात्म्याचा प्रकाश सगळीकडे पसरावा. माझे वडील म्हणायचे की, "हे सर्व होऊ शकेल. त्यासाठी सामूहिक चेतना जागृत होण्याची तू व्यवस्था कर. काही भाषणे नको करूस, ग्रंथ लिहिण्याच्या फंदांत पडू नकोस; त्यांतून आणखी एखादे बायबल वा कुराण बनेल आणि पुन्हा त्यांतूनच झगडे, वादविवाद होतील. म्हणून प्रथम तूं सामूहिक चेतना तयार कर." आणि आता ती सामूहिक चेतना कार्य करूं लागली आहे, हे अगदी सहज घटित होऊन गेले. पण त्याच्यामध्ये जे प्रश्न येत आहेत. त्यासंबंधी आज मला तुम्हाला सांगायचे आहे.

सामूहिक चेतना जागृत झाली आणि जगभर, अनेक देशांमधून, अनेक लोकांना सत्य समजले ही फार आनंदाची घटना आहे. पण असाही एक विचार येऊन खेद होतो म्हणजे या सामूहिकतेत आपण निवड करू शकलो नाही; दरवाजा उघडला म्हणनू अनेक लोक आत आले आणि येतांना बरोबर आपल्या वाईट गोशी पण घेऊन आले. आणि असे खराब लोक थोड्याशा संख्येने आले तरी फार नुकसान होते. नामदेव एवढे मोठे संत होते तरी ते पण म्हणायचे की जे लोक खराब आहेत ते सुधारू शकणारच नाहीत; त्यांची आत्मिक उन्नति होऊंच शकणार नाही. त्यांनी माशीचे उदाहरण देऊन सांगितले की माशी आपण खात असलेल्या

अन्नावर बसली तर आपल्यास यातना होणार आणि मेलेली माशी जर का आपल्या पोटात गेली तर आपणही मरणार. ही माशी कधी ठीक होणार नाही. सहजमध्ये आपल्यामधील अशा सर्व वाईट अवृत्ति गळून गेल्या पाहिजेत; जोपर्यंत ते होत नाही तोपर्यंत आपण वरच्या स्थितीला येणार नाही. पंखामध्ये काही जखम झाली तर पक्षालाही उडता येणार नाही. म्हणनू या आनंदाच्या आकाशामध्ये, ज्याला का मी 'रांगांवल' 'आईचा पदर' असे म्हटले. तुम्ही एखाद्या पक्ष्याप्रमाणे भरारी मारूं शकणार नाही. कारण तुमच्या पंखांमध्ये काही ना काही तरी अडकून बसलेले असते. आजचा दिवस एक शुभदिन आहे, पुष्कळ लोकांना वाटते की हा एक फार मोठा दिवस आहे कारण या दिवशीच काही विशेष कार्य घडून आले. असे लोकांनी पण सांगितले आहे परंतु आजच्या या दिवशी तुम्हां लोकांना एक विशेष कार्य करायचे आहे. तुम्ही फुग्यांची इतकी सुंदर आरास केली आहे की पाहूनच मन आनंदित होते; वाटते की साध्या रबराच्या वस्तूमध्येही आपल्याला आनंद व सुख देण्याची शक्ती आहे; आणि त्याची वस्तू पण सौंदर्यपूर्ण होऊं शकते. आपण तर माणसे आहोत एवढंच नव्हे तर सहजयोगी आहोत. तर दोन्ही स्थितीला येण्यासाठी आपण काय करायला पाहिजे.

मला आलेला एक अनुभव कथेच्या रुपाने मी तुम्हाला सांगते. मी हिंदीमध्ये बोलत आहे कारण हा दोष जास्त करून हिंदुस्तानी लोकांमधे आहे; इंग्रज वा पाश्चात्य लोकांमध्ये तो कमी प्रमाणांत आढळतो; त्यांना तेवढी अक्कल पण नाही. आमच्या या आजच्या भारतवर्षामध्ये पूर्वी अनेक देश सामावलेले होते; जसे सिलोन, बर्मा, पाकिस्तान, बांगला देश अशा अनेक देशांचा भारत होता. ही आपली भारतमाता आहे. पण लोकांनी त्याची शकले पाडली. कशासाठी हे तुकडे केले? असे झाले कारण या देशामध्ये असे लोक होते की ते म्हणून लागले की अमका-अमका आपल्या देशाचा लीडर झाला, म्हणजे बडा झाला मग आपणही असंच काही तरी करू या की आपण ही त्यांच्याइतकेच बडे बनू; ते प्रधानमंत्री होऊ शकले तरी मी पण तसाच प्रधानमंत्री बनू शकतो. ही ईर्षा वाढून त्यांना वाटूं लागले की आपला एक तुकडा स्वतंत्र केला तर त्यावर आपल्याला आपली सत्ता चालवता येईल. काही मोठमोठ्या घराण्यांतही कधी कधी असे होते की काहींना वाटूं लागते की आपण वेगळं घर आपल्यासाठी बनवले पाहिजे व वेगळे राहिले पाहिजे. मी आणि माझे कुटुंब स्वतंत्र वेगळे राहूं या म्हणजे आपला इतरांशी संबंध राहणार नाही. मानव प्राण्यांतच हे विभाजन करण्याची प्रवृत्ति असते. अशा तऱ्हेनेच बांगला देश हा एक स्वतंत्र देश झाला. त्यावेळेस मी तरुण होते. काही लोक एवढ्या छोट्या बांगला देशाला स्वातंत्र्य मागत होते कारण त्यामुळे आपल्याला आपलं राज्य चालवतां येईल असं त्यंना वाटायचे. म्हणजे इस्लामच्या नावाखाली म्हणा किंवा वर्णाच्या नावाखाली म्हणा. कुठल्या तरी सबबीवर विभाजन करायचे. आता तर बांगलादेशमध्ये अशी परिस्थिती आहे की मी तिथे जायचे म्हटले तर लोक मला सांगतात "माताजी, तिकडे जाऊं नका, गेलात तर तुमच्या डोळ्यांतून अविरतपणे अश्रूंच वाहू लागतील. इतकी दुर्दशा तिथे आहे." पाकिस्तान काय, सिलोन (श्रीलंका) काय तिथेही तीच परिस्थिती. हे जे तुकडे-तुकडे पाडून वेगवेगळे भाग बनवले गेले ते आपण आपले राज्य चालवूं असे म्हणण्यामुळे. पण त्या देशांतच अधिक प्रमाणावर प्रधान-मंत्रीच मारले गेले, त्यांचे खून झाले. ईर्षामुळे अशी ईर्षाच वाढत जाते. आणि असे वेगवेगळे ग्रुप्स बनत राहतात. मग आपापसात भांडणं, लढाई चालू होते. अजूनही आपल्याकडे ही विभाजन-प्रवृत्ती दिसून येते; कुठे विदर्भ, कुठे झारखंड वगैरे वगैरे प्रकार चाललेच आहेत. अशा भांडणांतून काय निष्पन्न होणार? कुणाला विभाजन करून काही मिळाले का? कुठल्याही प्रकारचे विभाजन करणे याच्या सहजयोग पूर्णपणे विरोधांत आहे. आपल्याला उलट सगळ्यांना जोडायचे आहे. Synthesis करायचे आहे. सहजयोगाचे सर्व कार्य Synthesis मधून चालते. आपल्याला जर Synthesis म्हणजे काय याची समज नसेल तर आपण सहजयोग सोडून देणेंच योग्य. अलिकडेच एक वाईट गोष्ट झाली; एक साहेब सहजयोगांत होते आणि ते दुसऱ्यांच्या डोक्यावरची भूते काढण्याच्या मागे लागले. मी त्यांना सांगितले की असे करू नका, नाही तर तीच भुते तुमच्या डोक्यावर स्वार होतील. पण त्यांना तो रोकच जडला होता. कदाचित त्यासाठी लोक त्यांना पैसे पण देत असावेत. नंतर त्यांनी आपला एक वेगळा ग्रुप बनवला.

सहजयोगामधेही जे त्यांच्यासारखे होते ते त्यांना मिळाले, आणि त्यांनी आपली एक वेगळी संस्था तयार केली. माझ्याबद्दल मात्र त्यंना काही शंका नव्हती; पण इतरांबद्दल, विशेषतः लीडर्सबद्दल त्यांच्या मनांत नाराजी होती. म्हणून सारखे त्याच्यातील दोष दाखवत राहून स्वतः मात्र अगदी युद्ध असल्याचा देखावा त्यंनी निर्माण केला. वर म्हणायचे आम्ही माताजींचे भक्त आहोत. मला न विचारता माझी परवानगी न घेता त्यंनी एक मोठा ग्रुप बनवला, माझे फोटो सगळीकडे वाटत राहिले. ..... काय काय करायला लागले मला माहीतच नाही. लीडर्सबद्दल हा चांगला नाही, अमका खराब आहे असं म्हणण्यांत काय अर्थ? जर कुणी खराब खरोखरच असला तर ते मलाच कुणी न सांगता समजत असते. जर तुम्ही मला मानता तर माझ्यावरच ते सोपवा; लीडर चांगला आहे का नाही हे माझे मलाच ठरवू द्या. पण लीडरशी वाद घालायचा. तूं हेच कां केलेस. ते का नाही करत इ. विचारण्याचा अधिकार तुम्हाला नाही. आता कुणी म्हणणे लीडर हवाच कशाला? त्याचे कारण म्हणजे मला सर्वांशी संपर्क राखणे शक्य नाही म्हणून अशा एखाद्या लीडरसारख्या माध्यमांतून मी तमच्याशी संबंध राखूं शकते. हे सोडून काही लोक लीडरवरच नाराज होतात. आता लीडरमध्ये काही दोष असतील तर ते काम मी करेनच. ते तुमचे काम नाही; वाटल्यास मला तुम्ही पत्र पाठवून कळवा. नुसते लीडर पसंत नाही म्हणून ग्रुप करत असाल तर त्यापेक्षा सहजयोगच सोडून द्या. अशा लोकांबरोबर आणखी दहा-बारा कच्चे सहजयोगी बुडू देत.

अशाच प्रकारच्या ७०-८० त्रासदायक लोकांनी, ज्यांना मी ओळखत नाही, ज्यांना मी कधी पाहिले नाही, एक मोठा ग्रुप बनवला आणि त्यांचा तो महाशय म्हणून लागला की, "मी कलकीचा अवतार आहे"... अवतार असाल तरअसा, मला काही म्हणायचे नाही, पण तुम्ही सहजयोगांत नाही, सहजयोगांत तुम्हाला काही स्थान नाही. पण लोक त्याला खरंच कलकीचा अवतार मानून त्याचे चरण पुजायला लागले, नाही तरी असे चरणछू महाराज असतातच. ते पैसे पण घेत राहतात. लीडरच्या ज्या दोषांबद्दल ते नाराज होते तेच दोष त्यांच्यावरही प्रादुर्भाव जमवूं लागले. मग सगळे लोक म्हणायला लागले कीं, हे काय चालले आहे? तर ईर्षा असली, महत्वाकांक्षा वाढूं लागली की असे प्रकार घडूं लागतात. त्यांत मग मूर्ख सहजयोगी पण अडकतात– कारण हा शेवटचा निवाडा आहे. लीडरबद्दल तर काय विचारायला नको – त्याचे चारित्र्य ठीक नाही, तो पैसे कमावतो, तो असाच आहे, तसाच आहे वगैरे, म्हणजे सीबीआय च्या वरताण प्रकार. मला आश्चर्यच वाटले. मला विचारून तरी करा. म्हणताना म्हणतात, "माताजी आम्ही तुम्हाला मानतो" मग मी म्हणेन मी सांगते त्यावर तरी विश्वास ठेवा. मग ते लोक गणपतिपुळ्यांला पण आले, माझ्यावर दगडफेक केली कारण एकदा मनावरचा ताबा सुटला कीं एखाद्या दारूड्याप्रमाणे आपण काय करत आहोत याचे भान उरत नाही. तिथे माझ्या प्रोग्राममधे येऊन त्यांनी तमाशा केला. मला खराब चैतन्यलहरी जाणवतच होत्या. हे सहजयोगी आहेत का हीच मला शंका आली. स्वतःची व्हायब्रोशन्स ठीक करण्याऐवजी ते दुसऱ्यांचे व्हायब्रेशन्स पहात होते. म्हणून अशा लोकांनी सहजयोगातून बाहेर पडायला हवे. त्यांचपैकी एखादा उभा राहिला तर त्याच्यामागे, आपल्याला स्वर्गात जायला मिळेल अशा खुळ्या समजुतीने, अनेक लोक लागतील. पण असं होत नाही. सहजयोग ही सामुहिक प्रक्रिया आहे. म्हणजे कुणाचे नुसते कान इकडे लागले. किंवा हात किंवा नाक लागले तर काहीच घटित होणार नाही कारण परमचैतन्याला तसं चात नाही. मग मी म्हणाले, "तुम्ही बंडाई माजवत आहांत" तर ते उलट म्हणाले, "तुम्ही आम्हालाच शिव्या देत आहांत;" मी पुन्हा म्हणाले, "मी तुम्हाला फक्त एवढेच सांगत आहे की चैतन्याविरूद्ध बंड माजवूं नका." म्हणूनच त्या प्रदेशांत भूकंप झाला होता. एक आई म्हणून मी त्यांना सांगत होते की सत्य आणि परमेश्वर तुम्हाला शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही. म्हणून एका आईचा उपदेश माना आणि हे सर्व सोडून द्यां. पण अजून ते अडकलेलेच आहेत.

सहजयोगांत कसली बळजवरी नाही. सहजयोगापेक्षा श्रेष्ठ असे मिळवण्यासारखे दुसरे काही नाही हे माहीत असूनही मी माझ्या कुटुंबातील माणसांनाही त्याची बळजवरी केली नाही. तुम्हाला यायचे असेल तर या, नको असेल तर तुमची मर्जी; पण असले बेफर धंदे करू नका. तसे केलेत तर तुम्ही सहजयोगी असं स्वतःला म्हणूंच शकणार नाही.

सहजयोगाच्या दृष्टिकोनांतून पाहिले तर लीडरबरोबर असें वागणे हे पाप आहे आणि त्यासाठी ग्रुप बनवणे हे महापाप आहे. तुम्हाला वाटले तर मला पत्र पाठवा, मी चौकशी करेन. खरे तर तुमचे बरोबर आहे की त्यांचे बरोबर आहे हे व्हायब्रेशन्सवरुन मला लगेच समजेल. पण पत्रांतून ते वाट्टेल ते लिहीत सुटतात, इतके मुर्खासारखे लिहितात की मी त्याचा विचारच करत नाही. कधी लीडरच असा आहे, अमका असा आहे असे म्हणत सुटायचे. तुम्ही स्वतःकोण मोठे महान जीव आहात का? स्वतःकडे आधी पहायाला शिका; स्वतः ठीक नसाल तर पुढे काय होणार? अशा गोष्टी घडू लागल्या तर सहजयोग संपणार. आत्तापर्यंत असं कुठे झालेले नाही. जे लोक बुडायला लागले आहेत त्यांना वाचवण्याचाच प्रयत्न आम्ही करत आलो; म्हणून जास्त सहजयोगी होतील तेवढे चांगलेच. पण मला असंही वाटते की परेश्वराचे हे साम्राज्य सत्यावर अधिष्ठित आहे म्हणून इथे येण्यासाठीही काही पूर्वतयारी करावी लागते. किंवा इथे जागा फार थोडी असल्यामुळे नालायक लोकांना बाहेर काढण्याचे कामही परमचैतन्य करत असेल. पण तुम्हाला या भानगडीत पडण्याचे कारण नाही. तुमची चेतना जागृत असेल तर आधी स्वतःकडे लक्ष द्या, दुसऱ्यांकडे पाहू नका, स्वतःमध्ये काय चुकत आहे तिकडे लक्ष द्यां. काही लोक पैशात अडकलेले असतात, पैसा बनवण्यासाठी ते सहजयोगांत येतात; पण तुम्ही त्यांनी सांगितले की सहजयोग हा पैसा कमावण्यासाठी नाही तरी त्यांच्या डोक्यांत ते शिरणार नाही.

आज मला हें पण तुम्हाला सांगावेसे वाटते की पैशाच्या बाबतीत लोकांना फार थोडी अक्कल असते. ख्रिस्त म्हणाले होते की जो पहिला तो शेवटचा आणि जो शेवटचा तो पहिला होणार. मी तसलं काही म्हणणार नाही. सुरुवातीला जे सहजयोगी मुंबईला आले ते मला म्हणायचे की आमच्या प्रत्येकाकडून एक हजार रुपये तरी घ्या. मी त्यांना म्हणायचे "बाळांनो, मला पैसे मोजतां येतनाहीत, पैसे कसे ठेवायचे हेही माहीत नाही. बँकेचा व्यवहार पण समजत नाही. पण तुम्ही एखादा ट्रस्ट केलात तर तुमचे पैसे त्यामध्ये मी ठेवीन." मला प्रामाणिकपणा दाखवायचा होता असं नव्हे तर अप्रामाणिक कसं व्हायचं ही अक्कलच माझ्याजवळ नाही. मला पैसे कसे मोजायचे हेच समजत नाही त्याला मी काय करणार? चेक कसा लिहायचा हे सुद्धा मला माहित नाही. तुम्हाला आता माहीत आहे की धर्माच्या नावाखाली कुणी पैसे मागायला लागला तर त्याला शिक्षा होणारच. पैशाचा खेळ फार धोकादायक असतो. म्हणून यावेळी माझ्या मनांत असा विचार आला की निर्धन महिलांसाठी- रस्त्यावर भीक मागणाऱ्या, नवऱ्याने टाकलेल्या अनेक निराधार मुस्लिम महिला, मुलांच्या पोटापाण्यासाठी भीक मागणाऱ्या, राजस्थान व बिहारमधून आलेल्या कंगाल स्त्रिया काहीतरी चांगले मदतकार्य करण्यासाठी एक संस्था असायला हवी. त्यासाठी तुम्ही आर्थिक मदत करायची जरूर नाही. आम्ही तुमच्याकडून कधीच पैसे मागितले नाही; ते सर्व जमून येते. पण मला वाटते की तुम्हालाही आशीर्वाद मिळावे म्हणून मी म्हटले की ठीक आहे, प्रत्येकाने ५०० रु. दान करा. पण त्यावरही एवढे वादंग माजले; माताजी, हे तुम्हाला कुणी सुचवले असे मला विचारू लागले मला कितीतरी पत्रे व फोनवरून तक्रारी आल्या.

मला कुणीही सुचवणारा असू शकात नाही. मी माझ्या स्वतःच्या इच्छेनुरुप चालते. हे तुम्ही लक्षात घ्यायला हवे. मी भोळी दिसत असेन पण मी तितकीच हुशार आहे! म्हणून मला बनवायचा प्रयत्न करू नका. सहजयोगासाठी तुम्ही एवढेसुद्धां करू शकत नाही? इतकी वर्षे खपून मी कित्येक रोगी बरे केले, इतके पैसे वाटले, काय काय केले पण एवढ्या लहानशा गोष्टीबद्दल इतक्या तक्रारी? मला दुःख होते. आधी पण एकदा या संकुचित प्रवृत्तीचा दोष दिसून आला होता. म्हणनू विशेषतः भारतीय लोकांनी पैशावरचे लक्ष काढून टाकले पाहिजे, म्हणजेच त्यांची सहजयोगांत प्रगती होऊ शकेल; नाही तर 'जेल-भरो' आंदोलन चाललेच आहे. मी तुमच्यामधील लक्ष्मीतत्व जागृत करून दिल्यावरही पैशाबद्दलचे तुमचे लक्ष कमी कसे होत नाही? जेवढे तुम्ही द्याल तेवढे तुम्हाला मिळणार आहे. देण्यामधे काय व किती आनंद असतो मला सांगता येणार नाही. तुम्ही मला जेव्हा काही भेट म्हणून देता तिचा तुम्हाला बरे वाटावे म्हणूनच मी स्वीकार करते. मला कशाची जरूर नाही आणि माझ्या घरांतही अशा वस्तू ठेवायला जागा नाही. तुम्ही इतकं प्रेमानं देता पण पुन्हा पुन्हा तेच सांगायचा– मला साडी देऊं नका.

दागदागिने देऊं नका, मला कशाचीही जरुर नाही इ. – कंटाळा येतो. मी असंही म्हणाले होते की मी सारे दागदागिने विकून टाकते. म्हणजे त्या पैशातून सारी कामे करतां येतील; तरी ते म्हणतात की तुम्हाला काय वाटेल ते करा पण आम्ही तुम्हाला देतच राहणार– मी हे सारे तुम्हाला आनंद मिळावा म्हणून करत राहते. मला कसली देवाण-घेवाण नको असते. मी काही घेतलेच नाही तर देणार तरी काय? पण आपण भारतीयांनी ही गोश समजून घ्यायला हवी.

आपल्या भारतदेशाला स्वराज्य मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मोठमोठ्या लोकांना मी बघितले आहे. माझ्या वडिलांनी त्यासाठी सर्व जमीन विकली, आईने सर्व दागिने विकले, सर्वजण तुरुंगात गेले. मला तर तिथे इलेक्ट्रिक शॉक्स दिले, बर्फाच्या लादीवर झोपवले. मला अर्थात काहीच झाले नाही. ते जणुं नाटकच होते; पण कित्येक लोकांना हालअपेशा भोगून दोन-तीन वर्षे तुरुंगवास काढावा लागला. म्हणा आताही लोक तुरूंगात जातच आहेत, शंकाच नाही; पण ते त्यांनी पैसे खाल्ले म्हणून, वर ते आव आणतात आम्हालाही तुरूंगवास घडला असे म्हणून! सहजयोगामधे ज्या लोकांनी गैरवर्तन केले त्यांना नक्कीच बाहेर पडावे लागणार आहे; कुणी लीडर विरूद्ध आवाज उठवला तर त्याला आम्ही बाहेर काढणारच. ही गोश नीट लक्षात ठेवा कारण आपल्याला एकसंघ रहायचे आहे (विभाजन नको). तुम्हीच स्वार्थी असाल, रिकामटेकडे असाल तर पोलिसांत किंवा सी. आय. डी. मध्ये भरती व्हा; लायकी नसतांनाही तुम्ही सहजयोगांत कशासाठी आलात?

आजच्या आनंदाच्या दिवशी हे सर्व बोलणे बरोबर नाही हे मला जाणवते. मी काल झोपले तेव्हा आज काय बोलावे! याचाच विचार करत होते. मी आतां ७४ वर्षांची झाली आहे मग काय बोलाजचे? पण वयोवृद्ध माणसांचे एकच काम असते, ते म्हणजे आपल्या मुलांना शिकवण देणे. मानवी जीवनाचा उद्देश काय व सहजमध्ये येण्याचा उद्देश काय हे समजावणे. सहजची वाट अगदी अरूंद आहे. सहजयोगांत तुम्ही स्वतःचा नाश करुन घ्यायला आला नाहीत; पण या अरुंद वाटेनेच तुम्हाला सहजचा प्रवास करायचा आहे; त्या वाटेच्या एका बाजूला मोठा डोंगर तर दुसऱ्या बाजूला दरी आहे. म्हणून तुमच्याजवळ दृढनिश्चय, सूज्ञता, शुद्ध इच्छा असेल तरच या बिकट वाटचालीतून तुमची उन्नति होणार. एरवी ते घटित होणार नाही आणि तुम्ही मधेच कुठेतरी अडकून रहाल.उंच डोंगरावर लोक गाढवांवर बसून चढत जातात; कुणी तरी त्या जनावरांना विचारले तुम्ही गाढव कसे बनलात? तर ते म्हणाले आम्ही पण तुमच्यासारखेच होतो पण अर्धवटच राहिल्यामुळे देवाने आम्हाला गाढवाचा जन्म दिला म्हणजे तरी आम्ही वरपर्यंत चढू शकू. या कथा तुम्ही ऐकल्या-वाचल्या आहेत. आपल्याकडे अशा अनेक कथा आहेत; या साऱ्या आपल्या मार्गदर्शनासाठी असतात; पण ज्या कथेत नीतिमूल्य असते त्याच खऱ्या कथा.

सहजयोगाचे सर्व ज्ञान तुम्हाला एक प्रकारे विनामूल्य मिळाले आहे. पूर्वजन्मींच्या तुमच्या पुण्याईमुळे तुम्हाला ते मिळाले आहे. पण सहजयोग मिळाल्यावर आणि इतके फायदे मिळाल्यावर तुम्ही कुचकामीच राहणार असाल तर तुम्ही सहजयोग सोडून द्यावा हेच बरे, म्हणजे मी पण सुटले. एरवी मी फारसा विचार करत नाही, निर्विचारच असते, पण आजकाल या गोशीचा विचार आला की मला काळजी वाटू लागते, कारण मी तुमची आई आहे आणि म्हणूनच तुम्ही स्वतःच्या चुकांमुळे अधोगतीला जाऊ लागल्याचे मला पाहवत नाही. त्याचे मला दुःख होते. सहजयोगात तुमच्याजवळ सर्वकाही आहे. कृपा, आशीर्वाद, आनंद, शांती–, तुमचे सर्व प्रश्नही चुटकीसारखे सुटतात. तुम्हाला हे माहीत आहे, त्याचा अनुभव तुम्ही घेतला आहे आणि तुम्हाला हे सांगायला हवं असे मुळीच नाही.

तुम्ही हा दिवस साजरा केलात, इतके सुंदर फुगे लावलेत त्याबद्दल मी आभारी आहे. पण फुग्यांची शोभा बघतांना आपल्याला हे पण दिसत आहे की त्याच्यापैकी काहींची हवा पार निघून गेली आहे. पाश्चात्य देशांत हा आणखी एक प्रश्नच आहे. त्यांच्या संस्कृतीप्रमाणे अहंकार असणे एक फार मोठी गोश साध्य करणे म्हणजे असे समजतात आणि अहंकाराची सवय झाली की माणूस कसा दिसतो मला चांगले माहीत आहे. असा माणूस मूर्खासारखाच दिसतो, तो बोलतो, स्वतःचे सांगत बसतो तेव्हा काय पहावे हे कळत नाही आणि त्याच्या मूर्खपणाला हसण्याचा मोह आवरत नाही. अहंकार हा मूर्खपणाचाच परिणाम आहे.,

त्याला काय म्हणावे किंवा त्याला कशाची उपमा द्यावी मला समजत नाही; पण तो या फुग्यासारखा तुमच्या डोक्यात फुगून तुम्ही हवेत तरंगू लागता आणि फुगा फुटला की जमिनीवर आपटता. सहजयोगी जसा जमिनीवर पाय घट्ट रोवून असतो तसं नाही आणि मग तुमचा सर्वनाश होतो, तुमचा सारा अहंकार खलास होतो. डोक्यात जर अहंकार बाळगून राहिलात तर तुम्हाला सहजयोगच समजणार नाही. असे अहंकारी लोक मी पाहिले आहेत. ते सहजयोगांत येतात पण फुशारकी मारतात की इतरांपेक्षा त्यांना ज्ञान जास्त आहे. 'स्व'ला खऱ्या अर्थाने समजण्यासाठी तुम्हाला आंतम[illegible] खोलवर जायला हवे आणि तसं होण्यासाठी हवेत तरंगत ठेवणाऱ्या डोक्यांतल्या सर्व कल्पना टाकून द्याव्या लागतात. कल्पना करा की तुम्हाला एखाद्या मोठ्या फुग्याला बांधून ठेवले तर मग सागरामध्ये तुम्ही खोलपर्यंत कसे जाणार? ते शक्य नाही. हवेत तरंगत रहाणे म्हणजे मूर्खांच्या राज्यांत जाण्यासारखे, दुसरं काय सांगू. इंग्लीश लोकांना Stupidity शिवाय दुसरा शब्द सांगता येणार नाही. त्या शब्दांत सर्व आल्यासारखं आहे. मग तुम्हाला कधी हे संपेल असे वाटणार नाही. मनाला येईल तसे तुम्ही वागाल; पण इतकं करून तुम्ही काय मिळवणार? त्यांतून काहीसुद्धा मिळणार नाही. आणि जरी काही मिळवलेत तर लोक तुमचा हेवा करतील. तुम्हाला खाली पाडायला टपून राहतील. तुम्हाला कोणी मित्र राहणार नाही, कुणी तुमच्याकडे ढुंकून पाहणारसुद्धा नाही; सहजयोगामध्ये असा माणूस असला तर लगेच ओळखला जातो. मी पाहिले आहे की काही लोक बोलायला लागले की महणतात Ah!आम्ही अशा माणसाला चांगलेच ओळखतो.

खूप पूर्वी पुण्यामध्ये मला एक अनुभव आला. एका हॉल (वाडा) मध्ये प्रोग्राम करण्याचे ठरले पण त्या वाड्याचे मालक म्हणाले इथे श्री माताजी प्रोग्राम करू शकत नाही कारण त्या ब्राह्मण नाहीत. तेव्हा सहजयोगी म्हणाले की ठीक आहे; असं असेल तर श्री माताजी ब्राह्मण नसल्यामुळे या वाड्यांत प्रोग्राम होऊ शकत नाही असे वर्तमानपत्रांत छापून देतो- मग ते लोक प्रोग्रामला आले; वाड्याचा मालक वर गच्चीवर बसला होता. त्याला कसला तरी विचित्र आजार होता आणि तो चालूंही शकत नव्हता. तिथले लोक एकदम थरथर कापायलाच लागले. मला काहीच ठाऊक नव्हते. मला त्यांनी काही सांगितले पण नव्हते की त्याच लोकांनी त्या प्रोग्रामला विरोध केला होता आणि आता ते थरथर कापत होते. अरे बाप रे, हे काय झाले? एकदम ते म्हणाले, "माताजी, हे सर्व थांबवा. आम्हाला कळले आहे की तुम्ही शक्ती आहात, पण हे थांबवा. आम्हाला सहन होत नाही!" मी म्हणाले, "तुम्ही हे काय केले?" तर म्हणाले, " आम्ही काही केले नाही. हा वाडा व इथे राहणारे लोक ब्राह्मण आहेत म्हणून आम्हाला वाटले की तुम्ही इथे कार्यक्रम घेऊ शकत नाही." मी म्हटले बस्, एवढेच! ते म्हणाले की इकडे बसलेले हे लोक बघा, असेच थरथरत आहेत. मी त्यांना तुम्ही ब्राह्मण आहात काय असे विचारले तर त्यांनी सांगितले की आम्ही ब्राह्मण नाही तर ठाण्याच्या वेड्यांच्या इस्पितळातले ठार (Certified) वेडे आहोत. त्यावर ते म्हणाले की आमच्यासारख्याच एका वेड्याला तुम्ही बरे केल्याचे आम्हाला समजले आहे; म्हणून आमच्या साहेबांनी आम्हाला इथे आणले आहे. आम्ही खरेच वेड लागलेले लोक आहोत. माझ्याकडे ते लोक बघत राहिले. मी त्यांना म्हणाले, "बघा, तुम्ही पण कापत आहात आणि हे लोक पण कापत आहेत तर आता तुम्हींच तुलना करा आणि ठरवा. मग त्या सर्वांनी सहजयोग घेतला. वर बसलेल्या गृहस्थांना मी म्हणाले, उठा आणि खाली या; खरोखरच ते खाली येऊ शकले; नंतर मला त्या दिवसापासून समर्पित होऊन त्यांनी खूप कार्य केले. मला म्हणायचे आहे ते हे की जे सहजयोगी सतत टीका करत असतात की सहजयोगांत हे ठीक नाही, हे करायला नको, आपल्याला खूप पैसे द्यावे लागतात, अमका लीडर चांगला नाही वगैरे वगैरे बडबडत असतात त्यांनी डाव्या हातांवर पातळ कागद ठेऊन फोटोसमोर बसावे आणि कापत राहणे बंद झाले समजावे की तर तुम्ही ठीक आहात, मग उजव्या हातावर कागद ठेवा, तो कागद कापू लागला तर तुमचा अहंकार वाढला आहे असे समजा. अहंकार कसा कमी करायचा तुम्हाला माहीत आहेच. मोहम्मदसाहेबांनी फार सोपा उपाय सांगून ठेवला आहे. आता आपल्यामध्ये अहंकार आणि प्रति अहंकार (संस्कार) या दोन संस्था आहेत आणि त्यामधूनच मन तयार होते; आपण सतत या दोन संस्थांच्या हुकुमतीखाली वावरत

असतो आणि मनाला खाद्य देत राहतो. म्हणून तुम्ही फार काळजी घ्यायला पाहिजे. स्वतःच ओळखायचे; डावा हात कापू लागला तर प्रति-अहंकार वाढला आणि उजवा हात कापू लागला तर अहंकार वाढला आणि मग त्याप्रमाणे ट्रीटमेंट अशा तऱ्हेने दोघांवर उपचार करायचे. माझ्यासमोर असतात की तुम्हाला चांगल्या व्हायब्रेशन्स जाणवतील कारण मी तुमची आई आहे, पण त्याचा अर्थ लगेच आपण संतुलनांत आहो असा नाही लावायचा; तर माझ्या फोटोसमोर ते करून बघा म्हणजे जास्त स्पष्टपणे कळेल. आई असल्यामुळे कसे सांगू समजत नाही. मी कधी कधी गंमत करते. फोटोसमोर दोन्ही तळहातांवर वर्तमानपत्राचा किंवा दुसरा कसला पातळ कागद ठेऊन बसा. मग एकदा एक बाजू व नंतर दुसरी बाजू चेक करून पहा आणि ओळखा. म्हणजे असे की सहजयोगात स्वतःचाच उद्धार करण्यासाठी तुम्ही आला नसून स्वतःची आत्मिक उन्नति करून घेण्यासाठी आला आहात. म्हणून स्वतःकडे लक्ष द्यायला शिका आणि आपल्यामध्ये काय कमी आहे ते जाणून घ्या म्हणजे तुमच्यात कोणता दोष प्रामुख्याने आहे, कशाचा त्रास आहे, कोणता दोष प्रगतीच्या आड येत आहे आणि कोणता हानिकारक आहे हे तुम्हाला कळेल.

सहजयोग म्हणजे आनंदाचा महासागर आहे. मी नसताना तुम्ही तो आनंद उपभोगू शकत असाल असे मी समजते. विमानतळावरची गोष्ट; मी स्वतः पाहिले आहे की माझे विमान चारचार-पाचपाच तास उशीरा आले तरी इतक्या रात्रभर टातकळत राहूनसुद्धा तिथे आलेले तुम्ही लोक टवटवीत दिसता! मी काय झाले विचारले तर म्हणता आम्ही रात्रभर भजने म्हणत आनंदात गुंग झालो होतो! म्हणजे तुम्हाला आनंद मिळाला तो त्या सामूहिकतेचा. असा सामूहिकतेचा आनंद पूर्णपणे लुटण्यासाठी आधी तुम्ही तुमच्यामधील स्वतःच तयार केलेले अडथळे दूर करून टाकले पाहिजेत. मग तुम्हाला खरा आनंद मिळेल आणि त्या आनंदात तुम्ही तरंगत रहाल. काही काही लोकांजवळ जागृतीच्या आधी कळली नाही तरी अशी काही संवेदना असते. काही लोक तर मुळातच इतके सहन असतात कीमलाच आश्चर्य वाटायचे. काही मोठ्या पदावरचे, नावाजलेले, समाजात अत्यंत प्रतिष्ठ व तत्त्वशील पण तितकेच गरम डोक्याचे, इतरांवर गुरगुरणारे व रागीट पण सहजयोग घ्यायला आले आणि एका निमिटांत पार! याला कारण म्हणजे मुळातच ते इतके गहन स्थितीचे असतात की चैतन्य सहजपणे शोषून घेतात.

प्रत्येकाला ते मिळवणे शक्य आहे पण त्यासाठी मनातील अहंकार व प्रतिअहंकार या दोन संस्थांची काळजी घेतली पाहिजे. भारतात तसे अनेक प्रकारचे संस्कार असतात; तर परदेशांत तऱ्हेतऱ्हेचा अहंकार असतो. मला आश्चर्यच वाटते. त्याला कसे तोंड द्यायचे हे कसं सांगावे मलाच कळेना. मानवाच्या मनानेच निर्माण केलेले हे सूक्ष्म शत्रू आहेत. म्हणून आज आपल्याला हे लक्षात घ्यायचे आहे की तुम्ही सर्वजण अजून लहान मुलांसारखे आहात, पण तुमचे हृदयही निर्मळ हवे म्हणजे तुमच्यातील शांतता व शुद्धता यांचे सौंदर्य तुम्ही जाणाल व आत्मसात कराल. पावित्र्याशिवाय या आनंदाचा अनुभव तुम्हाला मिळवणार नाही सहजयोगांत आपल्याकडे पुष्कळ लोक असले तरी पूर्वी होऊन गेलेल्या थोर संतांची शुद्धता आपण अजून मिळवलेली नाही. आपल्या देशाची लोकसंख्या अफाट आहे. उदा. काल ते अलीबद्दलचे भजन म्हणत होते; ते अवतारच होते आणि मीपण आनंदात होते. आता ते त्यांची स्तुती गात आहेत. पण त्या काळी त्यांना त्रास दिला ठार केले. अशी पुष्कळ उदाहरणे आहेत. दम-दम-साहेब, निझामुद्दिन औलिया इ. दुसऱ्या कुठल्याही देशांत झाले नाहीत असे थोर संत आपल्याकडे अनेक होऊन गेले हे असं का झाले? आपण चांगले लोक आहोत म्हणून हे घडले असे नाही तर आपल्यामधे सुधारणा करायची होती. हे घडवून आणण्यासाठीच त्यांचा इथे जन्म झाला. ही योगभूमीच आहे. कुठेही पहा, हरियानांतसुद्धा खूप संत होऊन गेल्याचे मला सांगितल्यावर मलाच आश्चर्य झाले. पण त्या सर्वांचा छळ झाला, त्यांना त्रास दिला गेला आणि त्यांना लोक समजू शकले नाहीत. काही मूर्ख, अज्ञानी व अधर्मी लोकांनी त्यांचा छळ करावा ही गोष्ट क्लेशकारक व दुःखदायक आहे. म्हणून आता सहजयोगी म्हणून हे शोधून काढणे तुमचे कर्तव्य आहे की कोण संतमहात्मे आहेत. सहजयोगातही काही दुसऱ्यांना त्रास देणारे लोक आहेत. तुम्हाला जर सत्य काय, प्रेम व करूणा म्हणजे काय हे जाणण्याची समजण्याची क्षमता नसेल

तर तुम्ही सहजयोगी नाही असेच म्हणावे लागेल.

तुम्ही फार दूरवरून (वरवर) लोकांकडे पाहिले तर तुम्हाला काही समजणार नाही. एकच बाजू दिसेल. आता माझं वय इतकं झाले आहे की मला तुम्हालाच विनंती करायची आहे की स्वतःकडे पाहायला शिका, आत्मपरीक्षण करा. कारण तुमच्या आजूबाजूला काहीतरी बडबड करून तुमची स्थिति बिघडवणारे लोकही आहेत. अमका अप्रामाणिक आहे. तमक्याचे चारित्र्य चांगले नाही अशा तऱ्हेची निरर्थक बडबड करणे अगदी सोपी गोष्ट आहे. आता एकत्रीकरण (Synthesis) करूनच सहजयोग बळकट होणार आहे हे आपल्याला पक्के समजून घ्यायचेआहे; तीच आपली शक्ती आहे. तुमच्या मनांत जरी विभाजन करण्यासंबंधी विचार आला तरी तो ताबडतोब काढून टाका. आजच्या या दिवशी हीच माझी तुम्हा सर्वांना विनंति आहे की कृपा करून आत्मपरीक्षण करा, जोपर्यंत तुम्ही ते करणार नाही तोपर्यंत तुम्ही आत्मसन्मान राखू शकणार नाही व स्वतःवर प्रेम करू शकणार नाही.स्वतःबद्दल आत्मीयता असेल तर आत्मपरीक्षण करून आपले काय व कुठे चुकते हे जाणू शकाल. आता पहा की मला ही साडी आवडते तर ती कुठे खराब झाली नाही ना हे मी लक्ष ठेऊन पाहते व जरा जरी डाग दिसून आला तर लगेच स्वच्छ करते. त्या डागाबद्दल मी लोकांजवळ बोलून प्रदर्शन करणार नाही. त्याचप्रमाणे तुमच्यामध्ये ज्या अ-सहज सवयी आहेत त्या शोधून गर्व न करता काढून टाका. नुसते त्याची चर्चा करू नका. अशा लोकांना "पुटपुटणारे जीव" (Murmuring souls) असे ख्रिस्त म्हणायचे, आणि त्यांच्यावर लक्ष ठेवा असे सांगायचे. मी तर पुढे जाऊन असे म्हणेन की अशा लोकांना दूर काढा. तेवढा एकच मार्ग आहे. हिंदीमध्ये त्याला "बकवास" असे म्हणतात– दुसऱ्याबद्दल नुसती सतत बडबड व टीका. स्वतः कसे आहोत हे पाहणे नाही. हे भारतात फारच चालते– भारतीय असूनही मला असे म्हणणे भाग आहे. नुसते मांड्या मारून चकाट्या पिटायच्या. सहजयोगाबद्दल काही बोलणार पण नाहीत. किती लोकांना खरा सहजयोग समजला आहे? मला जर पदवी द्यावी लागली तर तुम्हाला मी काय पदवी देणार? सांगा बरे; तुम्हाला तुमची व्हायब्रेशन्सही अजून समजत नाहीत. आता उत्क्रांतीच्या जाळ्यांत आल्यामुळे तुम्ही सहजयोगी जरुर झालात. पण किती जण त्यांत खोलवर पोचले. तुम्हाला ते मिळवण्यासारखे मात्र आहे.

म्हणून पुन्हा पुन्हा मला तुम्हाला हेच सांगायचे आहे की निरर्थक फालतू गप्पा मारणे आता बंद करा आणि सहजयोगाचे आपल्याला किती ज्ञान आहे हे एकमेकांकडून जाणून घ्या; त्यानेच तुम्ही मला प्रसन्न करून घेणार आहात. तुमचे सहजयोगांचे स्वतःबद्दलचे अनुभव दुसऱ्यांना सांगनू त्या ज्ञानात भर पडेल असं करा. अर्थात तुमच्यापैकी पुष्कळजण तसे करतात. मी नाही म्हणत नाही.पण एक जरी तुमच्यामध्ये खराब असेल तर त्याच्यामुळे सगळेच बिघडतात– पेटीतला एक खराब आंबा सगळे आंबे खराब करतो तसं हे आहे; तर मग तो खराब आंबा आपण काढून फेकून देतो ना?

आजूबाजूच्या सर्व वस्तु तुमच्याकडे मूक साक्षीकार म्हणून बघत असतात. मलाही तसेच वाटते. मोठमोठे डोंगर पाहिले की मला वाटते ते सर्व एखाद्या थोर संतांसारखे आपल्याकडे लक्ष ठेऊन बघत आहेत; या जगात जे जे काही घडत आहे त्याची सर्व नोंद ते करुन ठेवत आहे. त्यांना जणु सर्व काही समजते. त्यांनासुद्धा ज्ञान आहे. मला पुन्हा पुन्हा हेच सांगायचे आहे; आजच्या या शुभदिवशी स्वतःलाच नीट पहा, तुमच्या स्वतःच्या चक्रांकडे पहा आणि स्वतःमध्ये कोणते दोष आहेत ते जाणून घ्या. त्यांतूनच तुम्हाला चिरंतन आनंद मिळणार आहे, तेच वचन तुम्हाला मिळालेले आहे. त्यानेच तुम्हाला निर्विचार-समाधी मिळेल आणि त्यांतूनच तुम्ही निर्विकल्प समाधी मिळवाल. आपला अहंकार आणि प्रति-अहंकार यांच्या जाळ्यांत कधीही अडकू नका. आज माझा वाढदिवस साजरा करत आहात म्हणून माझे हेच सांगणे आहे की तुम्ही तुमचाच वाढदिवस साजरा करा; तो साजरा करताना तुम्ही काय मिळवले आहे आणि काय मिळवायचे आहे ह्याचे भान ठेवा. माझा वाढदिवस साजरा करण्यापेक्षा तुम्ही स्वतःचा वाढदिवस साजरा करण्याचा समय आला आहे. मला तर माझा वाढदिवस नव्हे तर तुमचा वाढदिवस साजरा करतांना जास्त आनंद मिळणार आहे.

परमेश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.

✪ ✪ ✪

# प. पु. श्री. माताजींनी विषाणूपासून रक्षण कसे करावे यावर केलेले मार्गदर्शन.

(पुणे दि. १.१२.८७)

काही गोष्टी गृहीत धरुन चालल्यामुळे आपल्यातच सुप्तचेतन तयार होत जाते. उदा. आपण सारखे काहीतरी करत रहातो. त्यामुळेच आपल्यात काही ग्रह करुन घेतो. आपण ते पुन्हा पुन्हा करत असतो म्हणजेच त्याला आपण 'सवयी' म्हणतो. काही सवयी आपल्याला सुप्तचेतनेकडून मिळतात. समजा येथे बसल्या बसल्या, मी एखादा तीव्र मादक पदार्थ घेते, ते एकदम खोल सुप्तचेतनेकडे पोहोचते व तेथून सामुहिक सुप्तचेतनेकडे. एकदम मला सामुहिक सुप्तचेतनेकडून पकड येते व पुन्हा ते घेण्याची इच्छा होते. औषधी नशा अशाच येतात. एकदा कां तुम्ही हा नशेचा डोस घेतला की तुम्ही त्या सुप्तचेतनेच्या क्षेत्रात पोहोचता. व तुम्हाला त्याच्याशिवाय चैनच पडत नाही.

उत्क्रांतीच्या ओघात काह भौतिक गोशी पृथ्वीवर आल्या व त्या निरुपयोगी म्हणून नंतर सामुहिक सुप्रचेतनामध्ये शिरल्या. उदा. आधुनिक युगात आलेले प्लॅस्टिक अशा अनेक गोशी बाजूला टाकल्या गेलेल्या, सामुहिक चेतनेमध्ये शिरल्या. तसेच वनस्पतीबावत म्हणता येईल. उदा. तंबाखूच्या वनस्पतीबाबत, असल्या वनस्पतीसुद्धां निरुपयोगी ठरून प्रवाहातून बाहेर फेकल्या जातील अशा तऱ्हेच्या अनेक गोशी चुकीच्या वापरामुळे निरुपयोगी ठरून तेथे सुप्तचेतनेत शिरतील.

वनस्पतीनंतर छोटे प्राणी सूक्ष्मप्राणी बाहेर फेकले जाऊन सामुहिक सुप्तचेतनेत स्थिरावले. या सर्वांच्या वर आहेत मानवप्राणी किंवा आकाराने मोठे प्राणी. जे या उत्क्रांतीच्या चक्रातनू बाहेर गेले ते सुद्धा तेथे आहेत. यानंतर येतात इतर प्राणी; त्यातीलही काही भ्रांत असून महत्वाकांक्षी पण अजूनही इच्छेने अतृप्त आहेत. असे हे सर्व सुप्तचेतन चाललेले आहे. अशा सर्व समस्या आपणाला निर्माण होतात उदा. पर्यावरणाच्या या सर्व सामुहिक सुप्तचेतनकडून येतात. पॅथोस (Pathos) म्हणजे पीडा. कोठूनही येणाऱ्या सर्व पीडा म्हणजे आपली डावी बाजू. म्हणून आपण हे सर्व प्रोटीन्सच आहेत असे म्हणणे हे अगदी धरून चालता येणार नाही. हे सर्व प्रोटीन्स नसतात पण त्यांचीसुद्धां वाढ होते. त्यांना अळंबे विषाणु म्हणता येईल (बुरशीजन्य पदार्थ Fungas) किंवा तत्जन्य पदार्थ हे सुद्धां प्रोटीन्स आहेत त्यानंतरही काही प्राणी आहेत उदा. इजिप्तच्या लोकांनी पाळलेले प्राणी उदा. इजप्रिशियन कुत्री आणि इतर फ्रेंच लोकही त्याच प्रकारातले. ते खूप दारू घेतात, सर्व प्रकारचे चीज खातात, तसेच इतर नासवलेले पदार्थ. त्यामुळेच ते ईजिप्तिशयनच्या मार्गावर गेले कारण ते सर्व डाव्या बाजूचे आहेत. त्यामुळे त्यांनाही हे आवडते हे सर्व त्यांनी ईजिप्तकडून घेतले.

अशा रीतीने आपल्या सुप्तचेतनेत या सर्व प्रकारच्या गोशींचा साठा केला गेला. से सर्व काही तेथे अस्तित्वात आहे. मोठी कठीण बाब आहे. मला म्हणायचे की या जगातील काहीही नाश पावत नाही. सगळे काही निरनिराळ्या कऱ्यांत ठेवले जाते. आपण तेथे शिरू नये कारण ते आपले स्वतःचे नाही. आपल्याकडून अनेक घोडचूका होतात. या क्षेत्रात मानवी मृतात्म्यांचेसुद्धां अस्तित्व आहे. काहीलोकं खूप पितात ती त्यांची स्वतःची सवय नसून त्यांच्यात शिरलेले ते भूत पित असते. हे भयंकर लोक (मृतात्मे) या लोकांतील निष्पापतेला आव्हान देतात. हे सर्व सुप्तचेतेनूतन घडते. परिणामी त्यांच्या मानगुटीवर भूत बसते. तो गुन्हेगार हीन कृत्ये करतात जी त्यांच्या सामुहिक सुप्तचेतनेचा परिणाम, त्यामुळेच हे लोक अशी कृत्ये करू शकतात. असे त्रासलेले लोक डाव्या बाजूचे असतात. नेहमीच त्रास भोगतात पण ते कावेबाज असतात. मोठे कावेबाज, अशांना पकडणे कठीण असते. त्यांना सर्व मार्ग सुचतात. याच दृशीतून इंग्लंडमधील सहजयोग्यांच्या अवस्थेकडे पाहता येईल. मोठे धूर्त लोक त्यांना सांगावे. या मार्गाने जा. असे करा अशक्यच मोठी कठीण अवस्था. त्यांना त्रास होतो, मग नंतर लक्षात येते.

याच्याउलट दुसऱ्या बाजूनचे (उजव्या) लोक अगदी

आक्रमक. दुसऱ्यावर आक्रमक करणारे. ते दुसऱ्यांना त्रास देतात छळतात. हा सामुहिक सुप्तचेतनेतील भूतबाधेचाही परिणाम असू शकेल. आणि ती व्यक्ती एकदम केव्हाही आक्रणक होईल. एखादा दारुडा पिल्यावर एकदम नम्र वाटेल मवाळ वाटेल, गोड बोलेल, आणि दुसऱ्या दिवशी कुणालाही बडवेल. बायकोला मारेल मुलांना बडवेल. हे सर्व कुठल्या प्रकारची बाधा आहे त्यावर अवलंबून आहे.

हे विषाणू प्रोटीन्स किंवा प्रोटिन विरहित असू शकतात आणि एवढे सूक्ष्म असतात, ते समजणे कठीण आहे. म्हणून त्यांचा दुसऱ्या कुठल्या संयुगाबरोबर जोडणे ज्याला क्लोनिंग (Cloning) पद्धती म्हणतात. त्यांच वितंचक्र (एन्झाईम) बरोबर जोडले जाते. काही एन्झाइम काही विषाणुबरोबर जोडले जातात. सर्वच एनझाईम विषाणुंना जोडता येत नाहीत. कोणते एन्झाईम कोणत्या विषाणुंना जोडले जाईल हे समजणे कठीण आहे. आणि याबाबतचे संशोधन जोमाने सुरु आहे. ॲन्टिबॉडीज (प्रतिद्रव्य) हेच कार्य करतात. ॲन्टीबॉडीज् ह्या एक प्रकारचे एनझाईम् तयार करतात आणि त्यांचा विषाणुबरोबर संयोग होऊन त्यांना नश करतात. काहींच्या बाबतीत सुखातीसच ॲन्टीबॉडीज नश होतात, ज्यांना एड्सची बाधा झालेली आहे. कारण त्यांच्यातील गणेशतत्वच नश पावते. 'गणेश' म्हणजेच सर्व गणांचा नायक 'गण' म्हणजे सर्व ॲंटिबॉडीज तोच जर संपला तर गणही संपले मग तुम्हाला कुठली प्रतिकार शक्ती?

म्हणून जे डाव्या बाजूला झुकतात ते नकळत मूर्खतेच्या डाव्या अंगास ओढले जाऊन, तसेच वागू लागतात आणि त्रास ओढवून घेतात.

या नव्या संयोगिकरण क्रियेवर जोरात संशोधन चालू आहे. शास्त्रज्ञ उंदीरांना विषाणुशी संसर्गात आणून त्यांच्या शरीरातील अशा विवंचकांना अलग करतात. म्हणजेच ज्या उंदरांत गणेश तत्व जिवंत आहे ते ती विवंचक निर्माण करतात जे रोगांशी संघर्ष करतील. अशी तऱ्हेने अधिक वितंचके निर्माण होतील. फक्त संयोगतीला जरा अवघड आहे. ते कसे घडवून आणायचे? हे संयोग घडवून आणण्यासाठी जगातील अनेक प्रयोगशाळा संशोधन केंद्रे या एकाच विषयावर कार्यरत आहेत. जणू एकाच झाडाच्या पानावर निरनिराळे औषधींचा प्रयोग करण्यासारखे आहे.

आणि याला दुसरा मार्ग म्हणजे सहजयोग. सहजयोगात तुमचे चित्त मुहिक सुप्तचेतनेतून, भूतकाळातील वर्तमानातील व आजचे सुप्ततेतून काढून, मध्यमार्गावर आणता येते. पण याकरितां ती व्यक्ती स्वतः पक्की असावी. त्याची इच्छाशक्ती प्रबल पाहिजे. जे डाव्या बाजूला जातात. त्यांची इच्छाशक्ती दुर्बल असते. त्यांना कितीही समजावले तरी ते पूर्वपदावर जातात. अगदी तुम्ही कितीह धूर्तपणे मेहनत घ्या, ते त्यांना कधीही समजणार नाही. पण ते सुद्धां शत्रूच्या क्षेत्रात (सुप्तचेतन) कळविले जाते. त्यामुळे ते अनेक समस्यांच्या भोवऱ्यात अडकतात व पीडा ओढवून घेतात, सर्व पीडाच.

आणि मानवी सूज्ञतूतून आपण यातनाच भोगणे हे तत्त्व पुढे येते. याला पर्याय नाही आणि यातना भोगणे म्हणजे त्यातही ईश्वरी तत्त्व आहे अशी समजूत करून घेतात. उदा. ज्यू व ख्रिश्चनांबाबत ऐकले असेल की यातना या आवश्यक, असे बिंबविले जाते आणि ते आपोआपच डाव्या बाजूचे होतात त्यामुळे ते भुतांच्या पकडीत जातता आणि नंतर उजव्या बाजूला जातात आणि तुम्ही पहाताच ज्यूंना हिटलरने छळले ते आता कसे आक्रमक बनलेत आणि जगातील ख्रिश्चनांनाही त्यांच्यामुळे यातना भोगाव्या लागल्या, एका हातात बंदुक व दुसऱ्या हातात बायबल घेऊन फिरले. हेच केले त्यांनी. अशा तऱ्हेने दोन्ही बाजूंनी त्रास करुन घेणे व दुसऱ्यालाही त्यात ओढणे. हे सर्व मोठ्या खुबीने या धूर्त कावेबाज लोकांकडून निर्मिले जाते. दोन माणसे सुखांत आहे, मजेत आहेत हे त्यांना बघवत नाही.

या सर्वांचा परिपाक म्हणजे तुम्ही अधिक असुरक्षितेकडे झुकता. अशा क्षेत्रात की तेथे भयंकर रोगांचे प्रकार. मूलाधार आघात सुरु होतात. मग एडस्, - स्नायु निकामी होतात, तुम्हाला कधी ताप येत नाही. डाव्या बाजूच्यांना कधीच ताप येत नाही कधीही हृदयविकाराचा झटका येणार नाही, कधीही, जोपर्यंत एखादा धक्का बसत नाही तोपर्यंत, एखादा अपघात वगैरे, कॅन्सरच्या माणसाला कधीही ताप येत नाही. आणि म्हणनू जेव्हा मूलाधार खराब होते तेव्हा एडसुची लागण होते आणि स्नायुसंबंधिचे सर्व रोग होतात आणि स्नायु कमकुवत होत जातात इ. इ.

नुकतेच लंडनमध्ये एकाला नीट चालता येत नव्हते किंवा बसताही येत नव्हते अशा माणसाला आम्ही बरे केले पंधरा मिनीटे तो माझ्यासमोर डाव्या हातापुढे एक मेणबत्ती ठेऊन बसला तेव्हा तो ठीक झाला. अगदी उडी मारली पण त्या नकारात्मक शक्तीच्या वेढ्यांत सापडून तो पुन्हा बिघडला एकंदरीत आपण मूलाधराबद्दल सतत जागृत राहिले पाहिजे. एखाद्याची पत्नी बाधिक असेल तर तिच्या संबंधामुळे पतीही बाधित होतो किंवा उलट. तेथे अशा अनेक प्रकारांची भयंकर बाधा आहेत.

अशा प्रकारची वाटचाल चालू असताना आणखी दुसरे व्यसन आले उदा. दारु. तिचे निरनिराळे परिणाम त्या व्यक्तीच्या सवयीप्रमाणे दिसतात एखादी व्यक्ती शांतस्वभावाची असेल तर ती दारुमुळे क्रोधाने खवळून उठेल, किंवा एखादा आधीच कोपिष्ठ असेल तर तो शांत राहील, असे हे मजेशीर आहे. कारण ते एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे झोकांड्या घेत असतात. दारुची नशा घातक आहे, तुमचे (लिव्हर) यकृत बिघडते, तुमची चेतना खराब करते, तुम्हाला बोजड करते, चित्तात गोंधळ निर्माण करते. आणि अंती ज्या नात्यागोत्याबाबत फ्रॉईड सांगतो, त्याच्या विपरीत परिणामातून हे सर्व घडते. म्हणून मदिरापानामुळे माणूस आपले सर्व धर्म विसरतो. तो आईला जाणत नाही. बहिणीला जाणत नाही, तो एकाकी पडतो. या एकाकीपणामुळे तो आणखी निर्लज्ज बनतो. मग म्हणतो 'त्यात काय चूक?' असे वागतच स्वतःला विनाशाकडे ढकलतो. आणि समाजही अशा प्रकारे अवनतीकडे झुकतो. हळूहळू समाजही अशाप्रकारे विनाशाकडे ओढला जातो कारण तेथे सर्व अधर्म. अधर्म, ते आणखी पितच जातात, पिणाऱ्यांना आपण काय करतो हे समजत नाही. डोके निकामी होते अगदी अधोगती. यात शंकाच नाही. तसेच अमली पदार्थाविषयीची नशा.

अंमली पदार्थांची नशा तुमच्या डाव्या नाभीवरच हल्ला करतये किंवा उजव्याही डाव्या नाभीवरील परिणाम अतिशय खोलवर पोहोचतात. एकदम तुम्ही आक्रमक होता. जरी तुमची डावी नाडी बाधित असली तरी. अगदी तुम्ही चक्रावून जाल. ती व्यक्ती वेडी होते अंमली पदार्थांची नशा माणसाला कुठे नेईल सांगता येत नाही. अगदी पूर्ण भरकटतील. जसे रजनीशचे शिष्य, सर्व वेडे, ठार वेडपट. त्यांना स्वतःचे भानच नसते. त्याच्यातील एकालाच आम्ही बरे करु शकलो, काही प्रमाणात अगदी शंभर टक्के नाही, तरी ७५ टक्के तो ठीक झाला. यावरून तुम्हाला समजेल की मूलाधार किती महत्वाचे आहे. तुम्ही मूलाधाराबाबत एवढे आहारी जाता हे सगळे चक्रवून टाकते. एवढे जरूर नाही. इंग्लंडमध्ये लग्नानंतर पहिले वर्ष समजुतीत जाते, दुसऱ्या वर्षी घटस्फोटाचा अर्ज आणि तिसऱ्या वर्षी तो साकार होतो. एकमेकांना सूज्ञपणे हळूहळू समजून घेण्यापर्यंत धीरही नसतो. मग सर्व संपते. कधी बायको पतीवर वर्चस्व गाजवते किंवा पति पत्नीवर वर्चस्व दाखवतो. ते कधीही समांतर चालत नाहीत कधीही एकविचाराने एकत्र येत नाहीत. या सर्व चुकीच्या कल्पना सामुहिक सुप्तचेतनेकडून येतात. सर्व चुकीचे घडवतात.

मला नुकतेच एकाकडून ऐकण्यात आले की, काही महिला एका मोकळ्या जागेत एकत्रितपणे झोपल्या. आजारी पडल्या. आणि नंतर परलोकवासी झाल्या हे कृत्य म्हणजे एक मोठे धार्मिक असून ते सर्व संतपदी पोहोचल्या असे समजले गेले. हे काही योग्य नाही. फ्रान्समधे, फ्रान्समध्येही चालते. अगदी हे सर्रास चालते रोममध्येही हाच प्रकार ज्या तऱ्हेने लोकांना विचित्रपणे पिडले जाते. हा सर्व डाव्या बाजूचा परिणाम महणजे लोकांनी यातनेत रहावे. जणू त्यातून त्यांना हौतात्म्य लाभते. अशा सर्व रोगकारक शक्ती निरनिराळ्या विषाणूंच्या रुपात तेथे आहेत. आपण नको तेथे हात घालतो. अशा भयंकर बाबी आपण टाळल्या पाहिजेत. पण माणसे आपले भान विसरतात आणि काहीतरी वेगळे करून दाखवावे म्हणनू विचित्र गोष्टींच्या मागे लागतात, म्हणतात काय होईल ते होईल. तुम्हाला स्वतःची पत असेल तर आणि जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही सहज जाणाल की असल्या घातक गोष्टींच्या कधी नादी लागू नये.

मी जर म्हणाले 'हे चीज (Cheese)तुम्ही खाऊ नका तर म्हणतात 'मला ते फार आवडते. तरी मी सांगते तुम्ही ते घेऊ नका. ते टाकून द्या. कारण मी जाणते तेथे विषाणु आहेत. असे तुम्ही स्वतःवरच संकट ओढून घेता. आणि अशाप्रकारे तुम्ही वागता तर ठीक आहे, पण मग तुम्ही स्वतःला सहजयोगी म्हणू शकत नाही.

या सर्वात जे चुकते ते म्हणजे, म्हणणे त्यात काय चूक? असे लोकांना पूर्ण अज्ञानी म्हणता येईल, मग काय बिघडते? म्हणून तुम्ही स्वतःचाच नाश घडवून आणता हे खरे नाही. परमेश्वराने तुम्हाला निर्माण केले, तुम्ही स्वतःला नाही. तुम्ही कोण स्वतःचा नाश करुन घेणारे? हा उद्योग कशाला? आणि सहजयोग्यांना हेच समजले पाहिजे. स्वतःचा नाश करणे स्वतःला बिघडवणारे आपण कोण? तुम्ही जाणले पाहिजे. इतराहून आम्ही वेगळे आहोत आणि अशा रीतीने तुम्हाला समजते की आपण आता त्या ''बौधा''चे अंग प्रत्यांग झालोत, एकाच नससंस्थेचे अंग प्रत्यंग आहोत, आम्ही योगी आहोत. मग कुठली विषाणूंची बाधा? कसले विषाणू? ते तुम्हाला इजा पोहोचवून शकत नाही, क्लेश देऊ शकत नाही. थोडा वेळ ते राहतील आणि निघून जातील. जरी त्यांना संसर्ग झाला तरी येतील तसे निघून जातील ते तुमच्या शरीरात फार वेळ टिकणार नाहीत.

✪✪✪

# सहस्रार दिन

५ मे १९८७

ऑस्ट्रेलिया आजचा दिवस सर्व सहज योग्यांसाठी फार महान आहे. फार पूर्वीपासून माझी इच्छा होती की आता उघडले पाहिजे पण योग्य वेळ येई पर्यंत मी वाट पहात होते. कारण योग्य वेळी ते करणे महत्वाचे होते.

औरंगाबाद मध्ये एका लहान मुलाने मला प्रश्न विचारला,श्री माताजी ब्रह्मचैतन्याची सर्व व्यापक शक्ती सर्व ज्ञानेंद्रियांच्या पलिकडची आहे तर ती कशी काय जाणवते? हा प्रश्न त्याने मला विचारला, तोच आज मी तुम्हाला विचारते.

या पूर्वी, ज्यांना साक्षात्कार झाला होता ते, जसे तुम्ही आता त्याबद्दल बोलू शकता की आम्ही ते आमच्या जाणीवेत अनुभवतो, तसे सांगू शकत नव्हते ते त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नव्हते, अनुभवात घालू शकत नव्हते. त्यांनी ते, जसे एखाद्याने आंब्याची चव शब्दात सांगावी तसे शब्दांनी सांगण्याचा प्रयत्न केला. आंब्याची चव ती खाल्ल्याशिवाय समजत नाही. मग तुम्ही कितीही सांगा की, फार उत्तम आहे, महान आहे इत्यादी. तेव्हां आता काय झाले आहे, हा प्रश्न आहे. याशिवाय पूर्वीचे संत होते, ते शेवटी कंटाळले. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी समाधी घेतली. एका खोलीत जाऊन ते तिथे बसले व समाधी घेतली. एका खोलीत ते तिथे बसले व समाधी घेतली व देह सोडला. त्यांनी उपमा दृष्टांत देऊन ते सांगण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्तांनी स्वतःला क्रूसावर चढवून घेतले हे कशामुळे झाले, इतके ते निराश का झाले? तर, हे गूढ काय आहे, ते कोणी तुमच्यापैकी सांगू शकतेय का?

उत्तर सोपे आहे पण पचनी पडायला अवघड आहे. ते म्हणजे या पूर्वी जे अवतार पृथ्वीवर झाले ते सहस्राराचा भाग आहे. ते ब्रह्मचैतन्याचा भाग होते. ते आदिशक्तीचा भाग होते. ते पृथ्वीवर आले व अशा लोकांना आत्म साक्षात्कार दिला की जे फार उच्च दर्जाचे लोक होते. की ज्यांना काहीच समस्या नव्हत्या जणू काही ते अवतार प्रेमाच्या महासागरातून आले व लोकांना त्या प्रेमाच्या महासागरात व त्याचा आनंद होण्यासाठी घेऊन गेले. जसे कबीराने सांगितले की, "जब मस्त हुए तो क्या बोले" म्हणून बऱ्याच लोकांनी मौन धारण केले. ते त्या प्रेमाच्या महासागरात पूर्णपणे विरघळून गेले. पण तुम्हाला तसे झाले नाही. तुमच्यात काहीतरी विशेष घडले आहे.

तर, संपूर्ण ब्रह्मचैतन्य प्रेमाचा, संपूर्ण महासागराने एका ढगाचे रुप घेतले आहे व ते म्हणजे आदिशक्ति. तुमच्यावर चैतन्याचा वर्षाव करण्यासाठी तुम्हाला जोपासण्यासाठी तुम्हाला मोठे करण्यासाठी पृथ्वीवर अवतरले आहे व तेही आपल्या प्रेमाचा आविष्कार करुन तुम्हाला आदिशक्तीच्या शरीरात धारण करण्यासाठी. गंगेच्या पाण्यात एखादा घडा असावा तसे तुम्ही आदिशक्तीच्या शरीरात एखाद्या पेशी प्रमाणे आहात व तुमचे व्यक्तित्व, व्यक्तिमत्व यांचा सांभाळ केला जात आहे. तरीसुद्धा तुम्हाला तुमच्या ज्ञानेंद्रियांच्या माध्यमामधून ब्रह्मचैतन्याची जाणीव होऊ लागली आहे व शिवाय दुसऱ्यालाही तुम्ही आत्म साक्षात्कार देऊ शकता. पण तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहात. जोपर्यंत तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहेत तोपर्यंत तुम्ही हे सर्वकाही करु शकता.

तर अशी महान घटना घडली आहे की, सर्व सहस्रार त्या अंतरात असलेल्या देवतांच्या सात पीठासकट उघडले आहे. सर्व हे संपूर्ण तुमच्या आईच्या रुपात आले आहे.

जी अतिशय नम्र आहे, खेळकर आहे व महामाया आहे. ही घटना सर्व मानवजातीच्या दृष्टीने व संपूर्ण विश्वाच्या दृष्टीने अतिशय महान आहे की तुम्ही आत्म साक्षात्कार घेऊ शकता, दुसऱ्याला देऊ शकता, ब्रह्मचैतन्याची अनुभूती घेऊ शकता. तर्काने समजू शकता व दुसऱ्याला समजावू शकता.

हेच उदाहरण घ्या जी फुले दिसत आहेत ती ज्या लोकांनी आणली त्यांच्या उष्णतेमुळे मरुन गेली होती. मी फक्त त्यांच्यावर चैतन्य लहरी मिश्रीत पाणी शिंपडले. आता बघा ती कशी टवटवीत दिसत आहेत. ब्रह्मचैतन्याने त्यांना पुन्हा ताजेतवाने केले आहे. तुमचे तसेच आहे. तुम्ही कसे ताजे व सुंदर दिसत आहात. सहजयोगी कोणीही ओळखू शकतो. या सर्व परिस्थितीत, आपण एक गोष्ट जाणली पाहिजे की काही मर्यादा आपल्याला पाळणे आवश्यक आहे. सर्वात प्रथम, की मी तुम्हाला माझ्या शरीरात धारण केले आहे. म्हणजे एखादी बाहेरची वस्तु शरीरात घेणे, ती सांभाळणे व वाढविणे. पण जर तुम्ही त्रासदायक झाला तर मी ते सहन करु शकत नाही व तुम्हाला बाहेर फेकावे लागते. काही लोक फारच रममाण होऊन राहतात.

उदा. मी तुम्हाला नाकात तूप सोडायला सांगितले होते. ती अगदी साधी गोष्ट आहे. पण महत्वाची आहे. कारण तुमचे हंसाचक्र फारच खराब आहे व एडसच्या रोगाचे एक लक्षण म्हणजे खराब झालेले हंसाचक्र. तुम्हाला एडसच्या रोगाचा धोका आहे. पण ही साधी गोष्ट सुद्धा पाळली जात नाही. मी काय सांगते, ते ऐकणे हे तुमचे धार्मिक कर्तव्य आहे. तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या पाहिजेत. माझे हात, माझी बोटं, माझे पाय, माझ्या आज्ञा ऐकतात मग तुम्हाला मी मोठे बनविले, मान सन्मान दिला, आदिशक्तिच्या शरीरात धारण केले व माझ्या शरीरात तुम्ही पेशी आहात तर मग तुम्ही का नाही पाळत?

सर्वात प्रथम म्हणजे अशा प्रकारचा प्रयोग करणे, बाहेरच्या वस्तूला शरीरात धारण करणे, म्हणजे फारच धाडसाचे काम आहे व कृती धोकादायक आहे. फारच प्रेमाने, कारुण्याने, पेशन्स ठेवून व सर्वात महत्वाचे म्हणजे अतिशय मेहनत करुन हे साध्य करावे लागते. तेव्हा, मी सहस्त्रार उघडले आहे, ही सर्वात महान घटना आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात मी सहस्त्राराची स्वामिनी आहे व सर्व चक्रांची स्वामिनी आहे पण मी सर्व चक्रांच्याही पलिकडे आहे. फारच पलिकडे आहे. जर अशी परिस्थिती आहे तर तुमच्या सहस्त्राराची काळजी घेणे फारच महत्वाचे आहे.म्हणजे माझी व तुमच्या स्वतःच्या हृदयाची. जे तुमच्या सहस्त्रारात ब्रह्मरंध्र पीठ आहे व जे तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर उघडले जाते.

सहजयोग सगळया बाजूने पसरत आहे पण त्याची उंची वाढली पाहिजे व तुम्ही, मी कोण आहे हे जर योग्य प्रकारे समजून घेतले तर सहस्त्रार सहजच स्वच्छ राहील. सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी मी जे काही सांगते ते तुम्ही मानले पाहिजे व मी देवत आहे हे जाणून माझ्या सांगण्याचे पालन केले पाहिजे.

सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी तुमचे हृदयच जर उघडले नाही तर माझ्या प्रेमाने मी ते कसे भरणार? तुमचे योगी बंधू भगिनींसाठी तुम्ही हृदय उघडे केले पाहिजे. मागे तुमच्या बाबतीत घडलेल्या घटनेमुळे जर तुम्ही चिंतीत असाल तर अशा घटना सहजयोगात घडणार नाहीत. ते अशा तऱ्हेने घडविले आहे. जर एक हात दुखत असेल तर त्याची काळजी घ्यायला दुसरा हात आहे. तुम्ही काही एकटे नाही. तुम्ही सामूहिकतेच्या शरीरात आहात जर कोणी मूर्ख व बावळट लोक असतील तर अशांच्यासाठी सहजयोग नाही, संस्कृतमध्ये त्यांना 'मूढ' म्हणतात. तसेच जे अतिशहाणे असतील व स्वतःला फसवायचा प्रयत्न करत असतील अशांसाठी सुद्धा सहजयोग नाही. मानवी बुद्धीमध्ये कसेही फिरण्याची क्षमता आहे. तसेच जे लोक असहजपणे वागत असतील त्यांच्यासाठी पण सहजयोग नाही. हळूहळू त्यांच्या चैतन्य लहरी जातील, तुम्ही आजारी पडाल, तुमच्यापुढे समस्या येतील व तुम्ही अडचणीत याल. ही तुम्हाला वॉर्निंग नाही तर विनंती आहे, कारण तुम्ही माझ्या शरीरात आहात. जेव्हा जेव्हा कोणी माझ्या शरीरात राहून मला त्रास देतो, तेव्हा मला तो सहन करावा लागतो. मला फारच हाल सोसावे लागतात. हा फारच विचित्र स्वरुपाचा सुळावर चढविण्याचा प्रकार आहे. ज्यामध्ये प्रत्येक क्षणाला, ज्याला हवे असेल तसे, तो मला त्रास देऊ शकतो. मला छळण्यासाठी सहजयोग्यांच्या हातात सर्व कायदे आहेत. तसेच त्यांची ही क्षमता आहे, शक्ती आहे, की ते निरंतर माझ्या हृदयात राहू शकतात. तुमची हृदये

उघडा. आता आपली हृदये कशामुळे बंद रहतात हे पाहिले पाहिजे. पहिले म्हणजे मागे घडलेल्या गोष्टींच्या भितीमुळे आपले हृदय बांधलेले राहते. जर वाईट अनुभव आला असेल, तर असे लोक फारच घाबरलेले असतात.

मी पाहिलंय आणि मला फार साश्चर्य वाटले की इंग्लंडमध्ये, एक दिवस सुदैवाने किंवा दुर्दैवाने, प्रथमच फार बर्फ बृष्टी होत होती आणि त्या दिवशी आम्ही दुसरीकडे हलणार होतो. म्हणून मला बाहेर जायचे होते. मी जाताना पाहिले की एका स्त्रीच्या हातात लहान मूल होते व ती दरवाज्यात उभी राहून दुसऱ्या स्त्रीशी बोलत होती. दुसरी स्त्री घरात आत उभी राहून, दरवाजा अगदी थोडासा उघडून व चेन तशीच ठेवून तिच्याशी बोलत होती. मी पुन्हा अर्ध्या तासाने परत आले तर, ती तशीच बर्फात उभी होती व आतली स्त्री तशीच आतूनच बोलत होती. मला आश्चर्य वाटले हा सारखा प्रकार काय चालू आहे? या आतल्या स्त्रीला लहान मूल घेतलेल्या स्त्रीची एवढी भिती वाटायचे काय कारण होते? त्याचे कारण म्हणजे तुमच्या मधील अहंकार! तुम्ही दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविले, दुसऱ्याला छळले व या सर्वांमुळे तुमच्या मनात भिती निर्माण झाली की, दुसरे ही तुम्हाला कोणीतरी छळले असेल व म्हणून तुमचे हृदय बंद झाले आहे. त्यामुळे दुसऱ्यासाठी तुम्ही तुमचे हृदय उघडू शकत नाही. दुसऱ्याला त्रास दिल्यामुळे तुम्ही गप्प बसता? एखाद्या प्रेतासारखे नुसतेच पहायचे.

समजा मी अशी असते, तर सहजयोगाची व सहस्त्राराची ही गुपितं तुम्हाला कोणी सांगितले असती? असा स्वभाव, ज्या लोकांना मागे कोणीतरी घाबरविले असेल, त्यांचा, अथवा ज्यांनी आपल्या खराब विशुद्धी चक्रामुळे इतरांना घाबरविले असेल, अशांचा होतो.

आक्रमकता हा पश्चिमेकडे आणखी एक स्वभावधर्म आहे. तो तुम्ही लोकांनी सुद्धा उचलला आहे. कोणतीही जबाबदारी तुमच्यावर सोपविली की लगेच तुम्ही आक्रमक बनता. माझ्या आत मला हे सहन होत नाही. समजा मी एखादे औषध घेतले व त्याच्यामुळे माझ्यातला काही पेशी फार आक्रमक झाल्या तर काय होईल? शेवटी मी कॅन्सरची रूग्ण होते. आक्रमक पेशींनाच घातक पेशी म्हणतात. अशा पेशी तुमच्याकडे व्यवस्थित लक्ष देत नाहीत, उत्तम आरोग्य देत नाहीत व तुम्ही दुसरे काही नाही, तर घातक पेशी होता, जिच्यामुळे कॅन्सरच्या प्रादुर्भाव होतो. कॅन्सरचे रुग्ण होते. अशी व्यक्ति सहजयोग्यांमध्ये कॅन्सर पसरविते. काही स्त्रीया व पुरुष कसे आक्रमक होते, याच्या मी कितीतरी भयंकर गोष्टी ऐकल्या आहेत. एखादे लहान पद तुम्ही एखाद्या व्यक्तीला द्या, लगेच ती आक्रमक होते. समजा एखाद्या व्यक्तिला लीडर केले, लगेच तिच्या नवऱ्याला किंवा बायकोला वाटायला लागते की, मी किंवा तिचा नवर जणू काही पंतप्रधान किंवा तशी व्यक्ति झाली आहे. हा आक्रमकपणा दुसऱ्याला आक्रमक बनविते. तुम्ही एक म्हणता मग दुसरा काहीतरी म्हणतो, अशी प्रतिक्रिया सुरु होते.आपल्यात स्वतःचे काहीच नाही का? की आपण प्रतिक्रियाशील होतो? कुठल्याच गोष्टींची प्रतिक्रिया होता कामा नाही. आपल्या कडे स्वतःच काहीतरी असेल तर आपल्यामध्ये दुसऱ्याने आपल्याला काही सांगितले किंवा केले तरी त्याची प्रतिक्रिया होता कामा नये. ते सर्व तिथल्या तिथे संपले पाहिजे.

तुमची हृदये उघडा, म्हणूनच तुम्ही भारतात आल्यावर पाहिले असेल की विशेषतः इंग्रज लोकांबद्दल किंवा पोर्तुगिज लोकांबद्दल त्यांच्या हृदयात कोणताही राग नाही. उलट त्यांना किती प्रेम आदर वाटतो. कारण ते, तुम्ही त्यांच्यासाठी चांगलं काय केलं, हे पाहतात. एकदा काही ब्रिटिश लोकांनी हायकोर्टाला भेट दिली. लगेच त्यांची भेट साजरी करण्यासाठी हायकोर्टाला सुटी देण्यात आली. पण तुम्ही जर इंग्लंडला गेलात तर ते तुम्हाला मारतीलच व हाकलून देतील. तर हा आक्रमक स्वभाव तुमच्या हृदयातून गेला पाहिजे. अगदी गेला पाहिजे. माझ्या शरीरात आक्रमक लोकांसाठी बिलकुल जागा नाही. मी कधीही तुमच्या बरोबर आक्रमकपणाने वागले नाही व तुम्ही ही माझ्याशी आक्रमकपणाने वागू नये. जर तुम्ही एखाद्या सहज योग्यांशी आक्रमकतेने वागलात तर तुम्ही माझ्याशी आक्रमक झालात. पण असे लोक इतरांशी आक्रमक नसतात. जसं वाईट नवरा बायकोशी आक्रमक असतो, इतरांशी नाही. जे सहजयोगी नाहीत त्यांच्याशी ते आक्रमक नसतात.

हा सहस्त्राराचा फार मोठा भाग आहे. कारण अहंकार सहस्त्राराचा फार मोठा भाग व्यापतो. तुमचे सहस्त्रार जर या अहंकारामुळे व्यापले गेले, तर मी तुम्हाला किंवा मला

स्वतःला सुद्धा काय मदत करु शकणार ? इतके लोक तुम्ही माझ्या शरीरात फास्ट सर्क्युलेट होत असता व बहुतेक माझ्या हृदयात रहाण्यासाठी धडपडत असता, पण ते माझ्या इगोमध्ये जाऊन बसतात. परंतु मी निरहंकारी आहे, कारण माझ्यात (प्रतिक्रिया) नाही. जर प्रतिक्रिया नसेल तर अहंकार वाढणार नाही. मी माझ्या शांती व वैभवात रहून सहजयोग घडवत असते.मी प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही

पण तुमच्या प्रतिक्रियेचा मला त्रास होतो. कारण तुम्ही माझ्यात आहात.

दुसरा भाग लहानपणापासुन असलेल्या भितीमुळे बनतो. अमेरिकन लोकांचे मला माहित नाही, पण पुष्कळ अमेरिकन लोक माझ्याकडे आले होते. ते अगदी वेडे होते. त्यांच्यात काहीच नव्हते ते एकतर बोलणारच नाहीत किंवा असंबद्ध बोलतील व काहीच समजणार नाही. फ्रेंच लोकांचे ही तसेच आहे. मला वाटते, जगात दुसऱ्या कोणाला वेड लागण्या आधी फ्रेंच लोक वेडे झाले असावेत. अगदी वेडे लोक, त्यांची एकही गोष्ट सरळ नसते. प्रत्येक गोष्ट उलटी असते. जेव्हा आपण भारतीय टेलिफोनला नावे ठेवतो, तेव्हा ते फ्रेंच लोकांनीच बनविले आहेत हे जाणले पाहिजे. मी नेहमी म्हणते की पुण्यातील टेलिफोन पाहण्यासाठी असतात. कारण त्याला पुण्यपटणम् म्हणतात. म्हणजे पुण्याचे शहर, आणि त्या टेलिफोन मधून फक्त परमेश्वरच ऐकू शकतो. पण परमेश्वर सुद्धा ऐकू शकत नाही. तेव्हा अशा प्रकारचा अर्धवटपणा किंवा वेडेपणा अथवा आक्रमक स्वरुपाचा वेडेपणा, हा अहंकार - प्रति अहंकाराच्या पातळीवर गेल्याने येतो. आणि प्रथम त्यांच्यात "ह्यात काय चुकले?" अशी प्रवृत्ती निर्माण होते, व नंतर जेव्हा बोलतात तेव्हा ते भांडत असतात आणि काही काळानंतर त्यांच्यातील आक्रमकता अगदी दिसून येते. आणि मग असे होते की त्यांची डोकी फिरली आहेत.अमेरिकन लोकांमध्ये हे सगळीकडे आहे. ते बोलत असतात तेव्हा एकही चांगला अमेरिकन सापडणार नाही की ज्याच्या चेहऱ्याचा किंवा शरीराचा एखादा भाग विचित्रपणे हालत नाही. प्रत्येक गोष्ट टर्गवण्याच्या अंतिम अवस्थेपर्यंत जातात. ह्याची पार्श्वभूमी अशी आहे की, एक भूत, आणि हे भूत, भूतकाळातले अथवा भविष्यकाळातले नाही, तर ते वर्तमानकाळातले आहे आणि या भूताला मी भौतिकता म्हणते.

ही "भौतिकता" अतिशय भयंकर आहे. ही अतिशय हास्यास्पद व लाजीरवाणी गोष्ट आहे जी मानवाला शोभून दिसत नाही. कुत्रासुद्धा ह्या भौतिकतेचा तिरस्कार करेल. मानव कोणत्या पातळीला येऊन पोहोचला आहे. ही भौतिकता माणसाला अत्यंत निर्लज्ज बनविते. एखाद्या स्त्रीला "तुमच्याकडे माझा चमचा आहे का?" असे विचारताना लाज सुद्धा वाटत नाही. भारतात, आम्ही लहान असताना सांगायचे, म्हणजे ती आमची संस्कृती आहे, जर एखाद्याची वस्तु आपल्याकडे असेल तर आपण ती सांभाळली पाहिजे, व परत केली पाहिजे आणि जर आपला हिरा जरी दुसऱ्याकडे असेल तरी तो मागायचा नाही. " हा चांगला शिष्टाचार नाही. हिरा हा महत्वाचा नसून, काय महत्वाचे आहे तर चांगले संबंध. मैत्री व दुसऱ्यांच्या भावनांची कदर तुम्ही असे कसे विचारु शकता? जर त्यांना हिरा सापडला असता तर त्यांनी तो परत केला असता. त्यांनी जर काही विचारलेच नाही, याचा अर्थ हिरा नाही आणि तो जरी असता तरी हिरा म्हणजे काय ? तुम्ही घातला काय किंवा त्यांनी घातला काय, काय फरक पडणार आहे?

माझ्या वडिलांच्या घराची दारे सतत उघडी असायची. दिवसरात्र उघडी असायची. ज्या अर्थी घराची दारे उघडी आहेत, त्याअर्थी घरात काहीच मौल्यवान वस्तु नसतील, असा विचार करुन कधीच चोर येत नसे. आमच्याकडे फक्त एकदाच चोरी झाली, चोराने फक्त ग्रामोफोन व काही रेकॉर्डस् पळवून नेल्या. माझे वडील म्हणाले की त्याला संगीत आवडते असावे म्हणून त्याने वस्तु नेली.तेव्हा आता पोलिसांना कळविण्यात काय अर्थ आहे?

म्हणून ही भौतिकता एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्यासारखी आहे आणि हा रोग सगळ्यात वाईट रोगापेक्षाही भयंकर अहे. लोक किती त्याच्या आहारी जातात! तुम्हाला असे डॉक्टर माहित असतील की जे एखाद्या क्षुल्लक रोगांसाठी तुमचे दात, डोळे, नाक असे सर्वकाही काढून घेतात. उदा. मलेरियासारखा रोग किंवा कुठलाही रोग तुमच्यातील सर्व सुंदरता, चांगलेपणा नष्ट करतो, काढून घेतो.

उदा. या भौतिकतेमुळे अनेक फॅशन्स सुरु झाल्या आहेत. स्त्रियांवर याचा लौकर परिणाम होतो. लांब बाहया घालण्याची फॅशन निघाली होती, भारतात सुद्धा सुरु झाली आहे. नंतर त्या लहान केल्या, अर्ध्या केल्या, नंतर त्या अजिबात राहिल्या नाहीत. मी म्हणते की " ह्या शर्यतीत मी धावणार नाही." माझ्या नेहमीच एकाच प्रकारच्या बाह्या असतात त्यामुळे मी त्याचा विचार करत नाही. मला हवं तसं माझा शिंपी शिवू शकतो कारण त्याला माहित आहे की " मी एकाच प्रकारे शिवते". फॅशनच्यामागे धावण्याची काय गरज आहे? आता एखादी नवीन शर्यत सुरु झाली त्याच्या बरोबर पळायला लागेल, दुसरी शर्यत सुरु झाली, त्याच्या मागे धावायला लागले, तिसरी शर्यत सुरु झाली त्याच्यामागे पळाला लागले. आणि ह्या फॅशन निरर्थक शर्यती मागे सदा सर्वकाळ धावत असता. आता डोक्याला तेल न लावण्याची एक नविन फॅशन सुरु झाली आहे . त्यामुळे तुम्हाला टक्कल पडते आणि तुम्ही टोप खरेदी करता. हे सर्व धंदेवाईक लोक घडवून आणतात, हा धंदा आहे. आधी तुम्ही टकले व्हा व मग त्यांच्याकडून टोप विकत घ्या. आता टोप स्वच्छ ठेवण्याकरिता वेगळे पैसे, वेडयासारखे चालू असते. आता दुसरा एक प्रकार, लंडनमध्ये आता एक नविन फॅशन सुरु झाली आहे. कारण त्यांना पैसा मिळवायचा असतो. लोकांमध्ये एवढेसुद्धा समजण्याची किंवा तर्कबुद्धी राहिली नाही की जे पूर्वी काही ते शिकवत होते आज त्याच्या अगदी विरुद्ध ते वागत आहेत. तुम्ही जुन्या फोटोत पहात असाल वापरत असत, तुमचे केस व्यवस्थित ठेवत असत, त्यानंतर आले, त्यानंतर घट्ट कपडे आले की ज्यामुळे काहींच्या रक्तवाहिन्यासुद्धा अरुंद होतात. आता तर अगदी सैल कपडे वापरण्याची फॅशन सुरु झाली आहे. एकदा तर मी पाहिले की एक स्त्री एका ब्लँकेट पासून तिचा पोषाख तयार करत होती. मला वाटले ती एखादी किंग दुसरी कोणी तरी असावी. इतका हा मूर्खपणा सुरु झाला आहे.

कल्पना करा, सहस्त्रारचा विचार करा. परमेश्वराचा विचार करा. " आपण कोणत्या जगात चाललो आहोत, ते जग अगदी मूर्ख आहे. तेथे लोक मूर्खपणाच्या गोष्टींमागे धावत असतात. ते बदलते जग एक डोकेदुखी आहे. कारण आता कोणती फॅशन आहे,याचा आपल्याला सतत विचार करावा लागतो. पेपरमध्ये शोधावे लागते की आता कोणती फॅशन चालू आहे. हे भूत तुमच्यात शिरल्यामुळे ही सर्व बनवा बनवी चालू आहे.

जेव्हा तुम्ही सहजयोगात येता तेव्हा काळजी घ्या की भौतिकता तुमच्यात प्रवेश करणार नाही. ते महत्वाचे नाही. जेव्हा एखादी व्यक्ति मरण पावते तेव्हा मला नक्की माहित नाही, तुम्हाला काळे किंवा पांढरे कपडे घालावे लागतात. इंग्लंडमध्ये माझ्या यजमानांचे जवळचे मित्र मरण पावले आणि माझ्याकडे पूर्णपणे काळी साडी नव्हती. आपल्याकडे अशी साडी नसते. मला समजत नव्हते काय करावे? मी माझ्या यजमानांना सांगितले की " माझ्याकडे काळी साडी नाही" आणि ते म्हणाले "मग तं म्हणाले तु येऊ नकोस." विचार करा मी जर त्यांच्या पत्नीकडे गेले नाही तर तिला काय वाटेल? त्याचे काही नाही आणि महत्वाचे काय तर काळी साडी.

ही भौतिकता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तुम्हाला फसवते. तुम्ही

यात कसे अडकलात हेच मला प्रथम समजत नाही. आणि दुसरीकडून तेच लोक तुम्हाला फसवितात. "बरं, हे काही बरोबर नाही. आता हे फार झालं. तेव्हा असंस्कृती काढा" असंस्कृती हा आणखी एक भौतिकतेचा प्रकार आहे. आणखी एक वेडेपणा आहे. लंडनमध्ये सध्या असंस्कृती चळवळ चालू आहे. ज्यांना पंक्स म्हणतात, म्हणजे असंस्कृतीची चळवळ म्हणतात. कदाचित आता हे कालबाह्य झाले असेल, मला वाटते, पण सध्या तरी पंक्स दिसतात.

तसे केस करायला त्यांना ४० पाऊंड भरावे लागतात. असे केल्याने तुम्ही पैसे वाचवता? तेव्हा या सर्व गोष्टी तुमचे चित्त सत्यापासून उच्च मूल्यांपासून, मूर्खपणाकडे वळविण्यासाठी केल्या जातात. सहजयोगामध्ये सुद्धा लोकांनी सामूहिकतेतच रहायला शिकले पाहिजे. आपण सामूहिकतेत असणं फार महत्वाचे आहे. हे माझं आहे, हे माझं आहे. हे माझ्या मालकीचे आहे, असे आपण कधीच म्हणू नये. अगदी मुलांच्या बाबतीतसुद्धा तुम्ही असे करु नये. हा माझा मुलगा आहे, हा माझा भाऊ आहे, ही माझी बहीण आहे, हे माझं, माझं, निघून गेले पाहिजे. परंतु हे शक्य नाही. हे विसरणे सोपे नाही. कारण यासाठी आपली

डावी नाभी व्यवस्थित असणं आवश्यक आहे. यासाठी, "आई हे सर्व काही तुझेच आहे." असे हा मार्ग आहे. हे असे म्हणण्यात काही धोकाक नाही कारण जे तुमचे आहे ते मी कधीच घेणार नाही. हे फक्त सुरु करण्यासाठी असे म्हणा की "आई हे सर्व काही तुझेच आहे. हे सर्व काही तुझेच आहे. मी तुझाच आहे. म तुझाच आहे, माझे हृदय तुझेच आहे, माझे सर्वकाही तुझेच आहे माझे जीवनही तुझेच आहे." या सहस्त्राराची देवता अगदी साधी आहे. खरंखरच साधी आहे. आणि ती छोटयाश्या कार्यामुळे लगेच प्रसन्न होते. थोडंस इकडे तिकडे करण्याने तिला प्रसन्न करता येते. तिला प्रसन्न करण्यासाठी काहीच विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. ती अत्यंत साधी आहे. व लहान लहान गोष्टीसुद्धा तिला आनंदित करतात. काल तुम्ही माझ्यासाठी फुले आणलीत व मी ती घेतली नाहीत. "इतक्या वेळे अपण फुले घेऊन बसलो आहोत पण श्री माताजींना का देऊ शकत नाही?" असा विचार तुम्ही नक्कीच केला असेल. मला हा चमत्कार तुम्हाला दाखवायचा होता, म्हणूनच मी ती घेतली नाहीत. आणि अगदी शेवटी ती घेतली. आणि आता पहा सर्व फुलांमध्ये ती किती सुंदर दिसताहेत. फक्त तुम्हाला हे दाखविण्यासाठी म्हणाले " मी आता दमले आहे." मी खाली बसले व तुमच्याकडे पाहिले तेव्हा तुम्ही सर्वजण हातात फुले घेऊन बसला होता. तेव्हा ती लीला विनोदिनी आहे आणि तुम्हाला एखादी गोष्ट करायला सांगते तेव्हा तुम्ही ती करीत नाही. परंतु जरा आड मार्गाने जाऊन मी तुम्हाला दाखविते मी तुम्हाला दाखविते की ही गोष्ट चुकीची आहे, हे तुम्ही करु नये. यामध्ये वाईट वाटण्यासारखे काहीच नाही. मला सर्व फुले घेता आली असती. परंतु कुणीतरी नक्कीच विचार केला असेल की श्री माताजींनी फुले का घेतली नाहीत ? तुमच्या मनांत असा विचार आला किंवा नाही हे मला माहित नाही. तण मला स्वतःला माहित होतं की हा चमत्कार त्यांना दाखवायला मला ही फुले घ्यायची आहे. आणि ती फुले आता सर्वात जास्त वेळ टिकतील कारण ती आता ब्रह्मचैतन्याने आली आहेत. मी गरम पाण्याचा नळ उघडूनसुद्धा नळाला थंड पाणी आले.

अशा प्रकारे अनेक चमत्कार या ब्रह्मचैतन्याचे तुम्ही बघितले आहेत की जे तुम्ही काढलेल्या फोटोमध्ये दिसतात, तुमच्या जीवनात तुमच्या जीवनात तुमच्या स्वतःमध्ये जो बदल घडतो त्यामध्ये दिसतात, तुमच्या कुटुंबामध्ये तुमच्या प्रत्येकामध्ये दिसतात. तुम्ही ब्रह्मचैतन्यामध्ये असल्यामुळे हे सर्व काही मिळत आहे. कारण ब्रह्मचैतन्याने तुम्हाला आशिर्वाद दिले आहेत. दुसऱ्यांना नाही, कारण ते एका वेगळयाच जगात आहेत. असाच तुमचा त्यांच्या बद्दलचा दृष्टीकोन असला पाहिजे. काय करायचं? त्यांना कशी मदत करायची? शक्य झालं तर एका मर्यादेपर्यंतच आपण त्यांना मदत करायची. दुसऱ्यांसाठी आपण स्वतःखाली ओढले जायचे नाही. एका मर्यादेपर्यंतच आपण त्यांना मदत केली पाहिजे. ही आनंदाची गोष्ट आहे की सहजयोग हा खूपच पसरत नाही. परंतु त्याची उंची वाढविण्यासाठी आपल्याला आपला दर्जा वाढवायला हवा. जर काही व्यक्ति उच्च स्थितीला गेल्या, तर इतरही जाऊ लागतील. त्यांचे बरोबर तेथे हेतुचा प्रामाणिकपणा हवा आणि अतिशय समजूतदारपणा हवा. एकमेकांसाठी हृदय उघडा म्हणजे तुम्ही माझ्यासाठी तुमचे हृदय उघडाल. प्रत्येक पेशी दुसऱ्या पेशीला माहित हवी नाहीतर हे घडणार नाही.

ही अतिशय महान घटना आहे की तुम्ही ह्या पृथ्वीवर असताना हे महान आशिर्वाद तुम्हाला मिळत आहेत. कितीतरी संताना ते मिळाले नाहीत. कितीतरी महान व्यक्ती ह्या पृथ्वीवर होऊन गेल्या, त्यांनासुद्धा ते मिळाले नाही. जे अवतार ह्या पृथ्वीवर होऊन गेले, त्यांनासुद्धा तुम्ही जे करत आहेत, ते करता आले नाही. तेव्हा, स्वतःच्या आत्म्याच्या पात्रतेचे, क्षमतेचे, समाधान व वैभव प्राप्त करुन घ्या. इतर लोक तुमच्या पातळीचे नाहीत. तर, तुमचे व्यक्तिमत्व असे घडू द्या, की जे कशाचीही प्रतिक्रिया करणार नाही. आपल्या जवळ आपल्या स्वतःचे अ[illegible]हीतरी आहे. आपण प्रतिक्रियावादी नाही. ज्या गोष्टी त्रासदायक आहेत त्या नष्ट होतील. सर्वकाही उत्तम, व्यवस्थित होईल. कारण आपण स्वतःच्या पूर्णत्वात व वैभवात उभे आहेत. आता आपल्याला कशाची गरज आहे? कशाचीही नाही. फक्त स्वतःच्या आत्म्याचा आनंद घ्या.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना आशिर्वाद.

✪ ✪ ✪

# भवसागर

**अंक क्रमांक ६ व ७ वरून पुढे**

## (मध्ये,डावे व उजवे चक्र)

**मंत्र :**

१) आदिगुरु दत्तात्रयाचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान** : श्री माताजी मलाच गुरु बनवा.

३) चैतन्य लहरी- नाभीच्या मागच्या बाजूस घ्या.

४) भोंदू वा बिन आत्मसाक्षात्कारी गुरु असेल तर त्याला सोडा वा त्याचा विचार करु नका.

५) भोंदू गुरुनी दिलेला प्रसाद, ताईत, पुस्तके, फोटो, भस्म, कपडे, माळ वगैरे वस्तू दिल्या असतील त्यांचा नाश वा नदीत नेऊन बुडवा.

६) भोंदू गुरुचे उपवास करणे, मंत्र म्हणणे वा ध्यानाचे विशेष प्रकार बंद करणे.

७) भोंदू गुरु नां जोडेपट्टी करणे, त्यांच्या नकरात्मक विचार सरणी सोडून द्या (जशा - तपस्वी स्थिती, बिघडलेली मनःस्थिती, समाज विरुद्ध वागणूकी)

८) मटक्याचा उपचार काही आठवडे बाधा बऱ्या होई पर्यंत घ्या. गाठ बांधून बात वा दोरी जाळणे. कागद - जाळणे वगैरे गोष्टी करीत चला. शांतता मिळेपर्यंत.

९) पोटाचा विकार असल्यास चैतन्य लहरीयुक्त मिठाचे पाणी प्या.

१०) भोंदू गुरुच्या बाधा घालवावयाच्या असल्यास हवन करा.

११) आपण आपल्या स्वतःचे गुरु आहोत ही विचारसरणी वाढवा- त्यामुळे भवसागराची डावी बाजू स्वच्छ होईल. उजव्या बाजू करता - जुन्या गुरुचा त्रास व ताण असेल तर माताजी आपणच माझे गुरु आहात असे म्हणा.

१२) आज्ञा चक्र व भवसागर यांचा संयुक्त संबंध असू शकतो. त्यामुळे डोळे फिरणे, मिच मचि होणे (डोळे झाकल्यावर) डोळे उघडा - माताजींच्या आज्ञा चक्राकडे लक्ष द्या. (पायाखाली पाणी घेतांना)

१३) मिठाच्या पाण्याचा उपचार जरुरीचा आहे. (गरम पाणी -डावी बाजू; थंड पाणी-उजवी बाजू)

१४) पूर्वीच्या आत्मसाक्षात्कारी गुरुनी माताजींच्यातच जन्म घेतला आहे याकरीता त्यांना माताजींच्या रुपांत भजा व पूजा करा . एकच शक्ति आहे. त्यांना (माताजींच्या रुपांत) पूजल्याने त्यांना आनंद मिळेल. (सत् गुरुचे स्थान मातीजींच्या रुपांत पहा, नाही तर त्यांना त्रास होईल.)

# अनाहत चक्र

**मंत्रः**

१) **मध्य :** जगदंबा व दुर्गामातांचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान :** श्री माताजी मला निर्भय बनवा.

३) हृदयाला मध्यावर चैतन्य द्या. छातीच्या मध्यावर व मागील दोन फऱ्यामध्ये.

४) श्वास ओढून रोखून धरा.

५) मृत नातलगांना पुनर्जन्म घेऊन , आत्मसाक्षात्कार घ्यावयास सांगणे.

६) कुटुंबावरबाधा असेल तर जोडेपट्टी करणे.

७) मेणबत्तीचा उपचार जेथे डावे स्वाधीष्ठान व मध्य अनाहत चक्र यांचा संयुक्त बिघाड आहे.

८) देवीची पूजा व १०८ नावे घ्या.

९) देवी महात्म वाचा.

१०) बायबल मधील २३ वा धडा वाचा.

११) हृदयादा मध्य व मागच्या भागावर मालीश करा.

१२) मनांत निर्भयता आणा व म्हणा, की 'जगण्माता माझ्याकडे बघते आहे मला कोणते भय'

**डावे अनाहत चक्र :**

**मंत्र :**

१) शिव-पार्वतीचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान :** - श्री माताजी मी आत्मा आहे.

३) डाव्या अनाहत चक्राला चैतन्य लहरी द्या.

४) प. पू. माताजींना हृदयात बसवा - त्यांचा प्रेमाचा व आनंदाचा आस्वाद घ्या.

५) आपले चित्त आत्म्यावर ठेवा.

६) जेव्हा डावी बाजू उजव्या बाजूच्या अति उपयोगामुळे बिघाड पावते. डावी बाजू उचलून उजव्याबाजूवर १०८ वेळा टाका. त्यामुळे बाधा पळेल. फोटोकडे उजवा हात ठेवा व डावा हात बांधलेला व तळहात मागे ठेवा.

७) आपण एखादी चूक केली असल्यास आत्म्याची क्षमा मागा. मनांत दोषीपणा ठेवू नका.

८) भवसागरातील कृती चालू ठेवा - भोंदू गुरु मुळे हे हृदय चक्र पकडले असेल तर (जे शिवाचे नांव घेऊन कार्य करतात)

९) आपणाकडून भार्या, आई, बहीण व मुलगी म्हणून चुकीचे नाते असले तर ते सुधारा. नवऱ्यांन बायकोंचे संरक्षण करावयास हवे.

१०) आईची सुरक्षितता वाढवा. माताजींच्या आईच्या प्रेमांत आपण बुडून जा.

**उजवे अनाहत चक्र :**

**मंत्र :**

१) सीतारामाचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान :** श्री माताजी आपणच माझ्यातील जबाबदारी आहात. श्री माताजी आपणच माझ्यातील चागल्या गुणाची मर्यादा व चांगल्या वडलाची उपयुक्तता आहात.

३) उजव्या अनाहत चक्राला चैतन्य लहरी द्या.

४) अति जादा जबाबदाऱ्या घेऊ नका. (परंतु योग्य ती जबाबदारी आवश्य घ्या.)

५) गुणवत्तेची बळकटी व वडलांच्या व नवऱ्याच्या संरक्षणाची निर्भयता मनांत वृद्धिगंत ठेवत चला. तुमच्याकडून एखादे चुकीचे बाप, पती, मुलगा भाऊ यांची मर्यादा ओलांडली तर सुधारा. पत्नीने पतीच्या असंरक्षणाचे कारण होऊ नये.

६) आपल्या कुटुंबाची योग्य काळजी व जबाबदारी घ्या आणि सहजयोग व सामुदायिकता यांना युक्त व पुश असे वातावरण वाढवा.

७) संसारातील मर्यादा व चांगली वर्तणुक वृद्धींगत करा. त्यामुळे समाजात त्याचा प्रतिसाद होईल.

८) उजवी बाजू भावनेमुळे बाधील झाली असेल, तर उजवी बाजू १०८ वेळा उचलून डावीकडे टाका म्हणजे उजवी बाजू ची पकड कमी होईल. डावा हात फोटोकडे व उजवा हात जमिनीवर ठेवा. त्यामुळे डावीकडच्या बाधा कमी होतील व उजवे हृदय चक्राची पकड सुटेल.

✪ ✪ ✪

(क्रमशः)